www.yuvakadhar.in

E mail - dainikyuvakaadhar@gmail.com

facebook : yuvakadhar

दैनिक

तरुणांचा बुलंद आवाज

मराठी

# युवक आधार








मुख्य संपादक - भारती संतोष आमले  उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे  निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील  सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २  अंक : 336  शुक्रवार दि. 22 ऑगस्ट २०२५  किंमत : ४ रु  पृष्ठ : 6  RNI MAHMAR/2023/89514


# 'एमपीएससी'चा अतिवृष्टीमुळे मोठा निर्णय स्पर्धा परीक्षार्थ्यांना दिलासा

पुणे : राज्यभरात सुरू असलेली अतिवृष्टी आणि इतर कारणांचा विचार करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षेबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. एमपीएससीच्या या निर्णयामुळे राज्यभरातील लाखो स्पर्धा परीक्षार्थ्यांना दिलाला मिळाला आहे. एमपीएससीने या बाबत प्रसिद्धिपत्रकाद्वारे माहिती दिली. एमपीएससीने २९ जुलै रोजी गट ब अराजपत्रित संयुक्त सेवा पूर्व परीक्षेची जाहिरात प्रसिद्ध केली. त्यानुसार सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक या पदांची निवड प्रक्रिया या परीक्षेमार्फत केली जाणार आहे. राज्यातील ३७ जिल्हा केंद्रांवर ही परीक्षा ९ नोव्हेंबर रोजी आयोजित केली जाणार आहे. संयुक्त पूर्वपरीक्षेतून मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी मुख्य परीक्षेची तारीख स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार असल्याचे 'एमपीएससी'ने स्पष्ट केले होते. या पार्श्वभूमीवर, राज्यभरात




सुरू असलेली अतिवृष्टी आणि अन्य कारणांमुळे जाहिरातीमध्ये नमूद केलेली आवश्यक कागदपत्रे मिळण्यास उमेदवारांना अडचणी येत असल्याने अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात यावी, अशी विनंती काही उमेदवारांनी एमपीएससीकडे केली. त्यास अनुसरून एमपीएससीने अर्जांसाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. आता उमेदवारांना २८ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्यासह ऑनलाइन पद्धतीने शुल्कही भरता येणार आहे. तसेच चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी ३० ऑगस्टपर्यंत चलनाची प्रत घेऊन १ सप्टेंबरपर्यंत चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याता येणार आहे. अधिक माहिती https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

दरम्यान, पदसंख्या आणि आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागांच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. या परीक्षेमधून भरण्यात येणाऱ्या विविध संवर्गपैकी जाहिरातीच्या दिनांकापर्यंत प्राप्त झालेली पदे जाहिरातीमध्ये नमूद केली आहेत. जाहिरातीमध्ये नमूद संवर्गातील पदांव्यतिरिक्त या परीक्षेमधून भरण्यात येणाऱ्या उर्वरित संवर्गातील पदांचा नंतरच्या टप्प्यावर समावेश होण्याची शक्यता आहे. त्यानुसार पूर्वपरीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंतच्या कालावधीपर्यंत संबंधित विभागाकडून सुधारित किंवा अतिरिक्त मागणीपत्राद्वारे प्राप्त होणारी सर्व पदे किंवा संवर्ग पूर्वपरीक्षेच्या निकालासाठी विचारात घेण्यात येतील.

अशा सुधारित किंवा अतिरिक्त मागणीपत्रांचा तपशील पूर्वपरीक्षेच्या निकाल प्रसिद्ध करण्यापूर्वी प्रसिद्ध करण्यात येईल. त्याच्या आधारे या परीक्षेमधून भरायच्या पदांसाठी भरती प्रक्रिया राबवण्यात येईल जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर, तसेच पूर्वपरीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंत नव्याने प्राप्त होणाऱ्या मागणीपत्रांमध्ये जाहिरातीत नमूद नसलेल्या संवर्गासाठी, तसेच सामाजिक आणि समांतर आरक्षणासाठी पदे उपलब्ध होण्याची आणि विद्यमान संवर्गातील पदसंख्येमध्ये बदल किंवा वाढ होण्याची शक्यता विचारात घेऊन उमेदवारांनी पूर्वपरीक्षेसाठी अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

पूर्वपरीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंतच्या कालावधीपर्यंत शासनाकडून सुधारित किंवा अतिरिक्त किंवा स्वतंत्र मागणीपत्राद्वारे प्राप्त होणारी सर्व सेवेतील पदे पूर्वपरीक्षेच्या निकालासाठी विचारात घेण्यात येतील. पूर्वपरीक्षेची जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर शासनाकडून सुधारित किंवा अतिरिक्त किंवा स्वतंत्र मागणीपत्राद्वारे प्राप्त संवर्गातील पदांचा समावेश पूर्वपरीक्षेच्या निकालापूर्वी शुद्धिपत्रकाद्वारे करण्यात येईल. यास्तव पूर्वपरीक्षेच्या जाहिरातीमध्ये पद आरक्षित नसल्यामुळे, पदसंख्या कमी असल्यामुळे अथवा संवर्गाचा समावेश नसल्यामुळे पूर्वपरीक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची, त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची कोणतीही तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही, असे 'एमपीएससी'ने स्पष्ट केले आहे.

## श्रावणीचा वाढदिवस एक वही एक पेन देउन जि.प्र.प्रा.शाळा हुडी येथे साजरा करण्यात आला.

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी विशाल भालेराव**

किनवट तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हुडी येथे नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत शाळेचे विद्यार्थिनी श्रावणी निलेश कदम इयत्ता पहिली हिचा शाळेतील पहिला वाढदिवस साजरा करण्यात आला यानिमित्ताने तिचा केक कापून व पुष्पहार अर्पण करून आनंदात वाढदिवस साजरा केला विद्यार्थ्यांना खाऊ वाटप व पेन वितरण करण्यात आले. तिच्या वाढदिवसानिमित्ताने श्रावणीला गावचे अनेक ज्येष्ठ नागरिक व, मा. ग्रामसेवक वनेकर साहेब इस्लापूर येथील वैद्यकीय अधिकारी शिंदे साहेब निर्गुण पाटील कदम पत्रकार विलास भालेराव आदिवासी समाजाचे कार्यकर्ते गणेश सटवाजीराव बोरकर,नागोराव जाधव सचिन घोगरे विठ्ठल बोरकर ईश्वर भालेराव mpw शेख साहेब अक्षय कदम जयजयरथ आटाळकर, वडील शाळेचे शालेय समितीचे अध्यक्ष निलेश पाटील कदम, शाळेचे शिक्षक श्री हिंगोले व सूर्यवंशी सर्व विद्यार्थी उपस्थित होते.




## शेडाळा - देऊळगावघाट परिसर : पावसाळ्यात पर्यटकांचे आकर्षण केंद्र

**दैनिक युवक आधार**
**आष्टी (प्रतिनिधी): बाळासाहेब रकटाटे**


शेडाळा ते देऊळगाव घाट या दरम्यानचे पठार निसर्गसौंदर्याने नटलेले आहे. पावसाळ्याच्या दिवसांत हा परिसर अप्रतिम रुप धारण करतो. हिरवाईचा गालिचा, डोंगरांवरून ओघळणारे झरे, धुक्याच्या पडद्यामागून डोकावणारा सूर्य आणि ढगांच्या संगतीत वाहणाऱ्या वाऱ्याच्या झुळुका-हे सारे अनुभवण्यासाठी पर्यटक या परिसरात थांबतात. दरवर्षी पावसाळ्याच्या काळात या मार्गावरून जाणारे प्रवासी थोडावेळ तरी गाडी थांबवून फोटो काढल्याशिवाय पुढे जात नाहीत. आजूबाजूच्या हिरवळीत आणि डोंगररांगांमध्ये निसर्गाने मनसोक्त उधळण केल्याचे दृश्य प्रत्येकाला आपल्याकडे खेचते.

**भाविकांचेही आवडते ठिकाण**

अहमदनगर व इतर जिल्ह्यांतून सावरगाव येथील बडे बाबा मच्छिंद्रनाथाच्या दर्शनासाठी जाणारे भाविक याच पठारावर आवर्जून थांबतात. निसर्गाच्या सान्निध्यात काही क्षण शांततेत घालवताना प्रवाशांना वेगळाच आनंद मिळतो.

जोमदारा तांडा लक्ष वेधून घेतो

या पठाराच्या मध्यभागी डोंगराच्या कुशीत वसलेला जोमदारा तांडा विशेष आकर्षण ठरतो. हिरव्यागार डोंगरांच्या घेरावात उभा असलेला हा तांडा प्रवाशांना मोहवून टाकतो. येथे उभे राहून संपूर्ण पठार, डोंगररांगा आणि पवनऊर्जा प्रकल्पाचे दृश्य टिपण्याचा अनुभव पर्यटकांसाठी अविस्मरणीय ठरतो. पवनऊर्जा प्रकल्पामुळे परिसर खुलतो



पठारावर उभारलेले प्रचंड पवनऊर्जा प्रकल्पाचे पंखे दूरवरून दिसतात आणि या रम्य दृश्याला वेगळेच आकर्षण प्राप्त करून देतात. निसर्गसंपदा आणि आधुनिक ऊर्जा प्रकल्प यांचा संगम येथे पाहायला मिळतो. महाबळेश्वरसारखा अनुभव या परिसराला भेट दिल्यावर पर्यटकांना जणू काही ते महाबळेश्वरला आले आहेत, असा भास होतो. ढगांची खेळती चादर, रस्त्याच्या कडेला उमललेली रानफुले, ओलसर गारवा आणि डोंगरांच्या कडेकपारीतून दिसणारे रमणीय दृश्य-हे सर्व मन मोहवून टाकते. पर्यटन विकासाच्या मागण्या स्थानिक ग्रामस्थ व प्रवाशांच्या मते, या पठाराला पर्यटन क्षेत्राचा दर्जा मिळावा यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा. येथे पर्यटकांसाठी बसण्याची सोय, (view point) उभारले जावेत.

सुरक्षित पार्किंगची व्यवस्था केली जावी.

दिशादर्शक फलक असावेत.

व मार्गदर्शक सेवा पुरविण्याची संधी द्यावी.जोमदारा तांडा व आजूबाजूच्या भागाला पर्यटन नकाशावर स्थान मिळावे.स्थानिक नागरिकांचा ठाम विश्वास आहे की, योग्य नियोजनाने या ठिकाणी पर्यटनाला चालना मिळाल्यास शेडाळा - देऊळगाव घाट परिसर पर्यटकांसाठी नवे केंद्रबिंदू ठरू शकते.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी निफाड नगरपंचायतीचे आवाहन

### पर्यावरणपूरक गणेश मूर्ती कार्यशाळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

**निफाड** - यंदाच्या गणेशोत्सवात पर्यावरणपूरक मूर्तींचा वापर करून सण साजरा करण्याचे आवाहन निफाड नगरपंचायतीने नागरिकांना केले आहे. नगरपंचायतीचे मुख्याधिकारी धीरज भामरे यांनी सांगितले की, प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) पासून तयार होणाऱ्या मूर्ती विसर्जनामुळे जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे मासे आणि इतर जलचर प्राणी धोक्यात येतात. पर्यावरण संतुलन जपण्यासाठी शाडू मातीपासून बनवलेल्या मूर्तींची स्थापना करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी नगरपंचायतीतर्फे जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. यात शाडू मातीच्या मूर्तींचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवले जात आहे. शाडू माती निसर्गातून मिळणारी असून ती पाण्यात सहज विरघळते व पर्यावरणाला अपायकारक ठरत नाही. निफाड नगरपंचायतीने सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, यावर्षी गणेशोत्सवात शाडू मातीच्या मूर्तींचीच स्थापना करावी व सणाचा आनंद पर्यावरणपूरक पद्धतीने लुटावा.




## अतिशय निकृष्ठ दर्जाचे काम, वारंवार फुटतोय मुख्य पाण्याचा पाईप

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**

श्रीवर्धन मध्ये सध्या पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी आहे आणि त्यात श्रीवर्धन शहरासाठी रानवली धरणातून शहरामध्ये पाणी पुरवठा करण्यासाठी नेण्यात आलेल्या मुख्य पाईप लाईन गेल्या महिन्याभरात जसवली गावाजवळ २०० मीटरच्या आतमध्येच तीन ठिकाणी फुटण्याचा प्रकार घडला आहे, त्यामुळे हे काम कोणत्या प्रतीचे झाले आहे यावरून लक्षात येतच आहे, श्रीवर्धन शहरामध्ये अनेक ठिकाणी पाण्याचे पाईप वारंवार फुटतच असतात, मुख्य रस्त्याच्या बाजूने ही पाईप लाईन गेली असल्यामुळे वाहतूक कोंडी समस्या निर्माण होत असते आणि रस्त्यांची सुद्धा दुरावस्था होत आहे, तालुक्याच्या ठिकाणी रोजगाराची कमी आहे पण श्रीवर्धन मधल्या मोठ मोठ्या सरकारी कामांसाठी श्रीवर्धन तालुका तसेच रायगड जिल्हाबाहेरच्या नेत्यांच्या मर्जीतल्या ठेकेदारांना काम दिले जाते आणि अतिशय निकृष्ट दर्जाचे काम त्यांच्याकडून केले जाते, त्याचा त्रास हा स्थानिक नागरिकांना सहन करावा लागतो, संबंधित पाईप लाईनच्या कामाचा ठेकेदार हा कोल्हापूर मधील असल्याचे सांगण्यात येत आहे आता त्याला जाब कोण आणि कसा विचारणार हाच मोठा प्रश्न आहे , अशा कामामुळे अतिरिक्त भार हा नगरपालिका आणि संबंधित विभागावर पडत असतो, सदर देखभाल दुरुस्तीसाठी ठेकेदाराच्या अनामत रक्कम मधून काम केले जात आहे की नगरपालिका स्वतः यावर खर्च करत आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे, तरी संबंधित ठेकेदारावर कोणती कारवाई होणार की नाही याकडे सगळ्याचे लक्ष लागले आहे.




## "पर्यावरणपूरक बाप्पा ; रेवदंडा-चौलच्या कारखान्यांतून गणेशभक्तांसाठी सजताहेत शाडूच्या मूर्ती"

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

गणेशोत्सवाची लगबग सुरू कारखान्यांत बाप्पा साकारतेय जिवंत कलाकृती गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून कोकणातील गावोगावी कारखान्यांत गणपती बाप्पाच्या मूर्ती साकारण्याची लगबग शिगेला पोहोचली आहे.

रेवदंडा-चौलसह परिसरातील शेकडो कारखान्यांत मूर्तिकार, महिला, तरुणाई अगदी लहान मुलं देखील आनंदाने बाप्पाच्या कामात गुंतलेली दिसत आहेत. मागील तीन महिन्यांपासून सुरू असलेले काम आता अंतिम टप्प्यात आले असून सुबक मूर्तींना रंग चढवण्याचं व हिरे-मोतींच्या सजावटीचं काम दिवसरात्र सुरू आहे. मूर्तिकारांचं लक्ष बाप्पाच्या डोळ्यांवर खिळलेलं असून प्रत्येक मूर्तीमध्ये भक्तिभाव ओतला जात आहे. वाढती महागाई, पण उत्साहात कसलीच कमी नाही यंदा महागाईमुळे मूर्तींच्या किंमती वाढल्या आहेत. शाडूच्या मातीच्या दरात दहा टक्के वाढ झाली असून रंगसाहित्य, सजावटीचे साहित्य आणि मजुरीच्या खर्चामुळे कारखानदारांपुढे आव्हान उभं राहिलं आहे. तरीदेखील भक्तांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी



मूर्तिकार झटत आहेत.मजूर मिळण्यात अडचणी, विजेचा लपंडाव असूनही कारखानदार दिवसरात्र काम करून वेळेत मूर्ती भक्तांच्या हाती पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहेत.पर्यावरणपूरक बाप्पा रेवदंडा, चौल आदी गावांमध्ये तयार होणाऱ्या बहुतांश मूर्ती या शाडूच्या मातीच्या असतात. त्यामुळे विसर्जनावेळी पर्यावरणाला धोका पोहोचत नाही. मूर्ती पूर्णपणे विरघळून जाते, ही विशेष बाब भक्तांच्या समाधानात भर घालते. चाकरमान्यांची ओढ गणेशभक्तांचा आनंदोत्सव कोकणात गणेशोत्सवाला वेगळंच महत्त्व आहे. चाकरमानी हजारोंच्या संख्येने गावाकडे परत येतात, घराघरांत बाप्पाची स्थापना, पूजा, आरत्या, भजनी मंडळांचा गजर आणि उत्साहाने ओथंबलेली गल्लीबोळं यामुळे कोकणात सणाचा माहोल अनुभवायला मिळतो.

महागाई कितीही असली तरी कोकणवासीयांच्या भक्तीत व आनंदात कोणतीच कमी पडत नाही.अंतिम टप्प्यातील लगबग २७ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या उत्सवाच्या तयारीसाठी रेवदंडा हरेश्वर मंदिर येथील नंदू चुनेकर यांच्या कारखान्यांत आता दिवस रात्र गडबड सुरू आहे. सजावट, रंगकाम आणि बारकावे यांत गुंतलेले कारागीर, तर उत्सुकतेने मूर्तीची वाट पाहणारे गणेशभक्त यामुळे गणेशोत्सवाचा जल्लोष अगोदरच अनुभवायला मिळतो आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा'

### अनेक मान्यवरांची लाभणार उपस्थिती; सर्वोत्कृष्ट भजनी मंडळाला 51 हजार रुपये बक्षिस

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने पनवेल शहरातील मार्केट यार्ड मधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धेचे उदघाटन शनिवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी सकाळी ९. ३० वाजता माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ



नेते वाय. टी. देशमुख, पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पंडित शंकरराव वैरागकर, बंडाराज घाडगे, नंदकुमार पाटील, ह. भ. प. निवृत्तीबुवा चौधरी, शंकुनाथबुवा पडघेकर, महादेवबुवा शहाबाजकर, सारेगम फेम जितेंद्र तुपे, इंडियन आयडॉल विजेता सागर म्हात्रे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. हि स्पर्धा 'पुरुष खुला गट' आणि 'महिला खुला गट' अशा दोन गटात होणार आहे. स्पर्धेतील प्रथम पारितोषिक ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांक २५ हजार रुपये, तृतीय क्रमांकास १५ हजार रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक ७ हजार रुपये, तसेच उत्कृष्ट पखवाज वादक व उत्कृष्ट तबला वादक यांना प्रत्येकी ७ हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह असे आहे. शनिवार आणि रविवार असे दोन दिवस आयोजित या स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण सोहळा दिनांक २४ ऑगस्टला सायंकाळी ०६. ३० वाजता होणार आहे. या स्पर्धेचा भजनप्रेमी रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री रामशेठ ठाकूर विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी, श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर व आयोजन समितीने केले आहे.

## शेडुंग ते बेलवलीकडे जाणाऱ्या रस्त्याची चाळण, डागडूजी करण्याची शेकापची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल:वार्ताहर**

शेडुंग पासून ते बेलवली कडे जाणारा रस्ता खड्ड्यात हरवल्याने त्याची डागडुजी करण्याची मागणी शेकापचे चिटणीस मंडळ सदस्य पनवेल तालुका, वसंत काशिनाथ फडके यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायत भिंगार मधील शेडुंग ते बेलवली कडे जाणारा रस्ता खराब झालेला आहे. या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. रस्त्यावरील डांबर गायब झालेली आहे. गणपती उत्सव आठवड्याभरात सुरू होणार आहे. त्यामुळे या खराब रस्त्यामुळे नागरिक बाजारहाट करण्यासाठी जाताना त्यांची मोठी गैरसोय होत आहे. खड्डे चुकवताना नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्याकरता रस्त्याची तातडीने दुरुस्ती करणे गरजेचे आहे. या रस्त्याची ताबडतोब डागडूजी करून खराब रस्ता चांगला बनवावा अशी मागणी वसंत फडके यांनी केली आहे.



## माजी पंतप्रधान भारतरत्न स्व.राजीव गांधी जयंतीनिमित्त निफाड तालुका काँग्रेसतर्फे अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

**निफाड** : भारताचे माजी पंतप्रधान व भारतरत्न स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त निफाड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने निफाड येथील काँग्रेस भवन येथे आयोजित कार्यक्रमात अभिवादन करण्यात आले

तालुका काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष संपत कराड यांच्या हस्ते राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, निफाड तालुका महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा रोहिणी शेळके, काँग्रेस पदाधिकारी संजय घुमरे, अशोक पगारे, माजी सरपंच रघुनाथ कुंदे, अनुरूप कुंभार्डे आदी उपस्थित होते.




## राजेश मासवकर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**मुंबई:- (प्रमोद तरळ)**



ज्येष्ठ समाजसेवक आणि शांताराम चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष श्री राजेश शांताराम मासवकर यांना रविवार दि. १७ ऑगस्ट २०२५ रोजी जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक कवी महासंघ आणि झुंजार लेखणी तर्फे मुंबई पत्रकार भवन येथे पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२५ देऊन गौरविण्यात आले माजी आमदार श्री. अशोक धात्रक आणि बापू बिरू वाटेगावकर यांची नात आणि अहिल्या देवी होळकर यांच्या वंशजातील सुनबाई सौ.तेजस्वी ताई गलांडे होळकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुरस्कारासाठी निवड केल्याबद्दल श्री. सुरज भाऊ भोईर यांचे आभार मानले आहेत शांताराम चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून समाजातील उपेक्षित वंचित घटकांसाठी निरपेक्ष,निरलस वृत्तीने कार्य करणाऱ्या श्री राजेश मासवकर यांना हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे

# निवळी येथील सिंचन तलावाच्या पाळू सारसोळीने केले भोगदा

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे**
**पपु निवळीकर**

नांदेड - मुखेड तालुक्यांमध्ये लेडी प्रकल्प लोकांच्या जिवावर उठला आहे मुखेड तालुक्यातील दिं १८/८/२०२५ या दिवशी झालेल्या मुसळधार पावसाच्या ढग फुटी मुळे अनेकांचे घरे उद्ध्वस्त तर शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान रावणगाव हासनाळ भेंडेगाव भिगोली निवळी येथील झाले आहे लोकांनाच्या घरामध्ये अन्न धान्य पासून सर्व काही झाले आहे उध्वस्त

पाण्यामुळे गमवावे लागले अनेकांचे जनांचे प्राण तर निवळी येथील झालेल्या मुसळधार पाऊसा मुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण निवळी येथील सिंचन तलावाच्या पाळूला केले सारसोळीने भोगदा तर १० वर्षा पासून प्रशासनाचे दुर्लक्ष तलावाच्या पाळूवरती दोन्ही बाजूंच्या पिंचीगला झाडांचा डोंगर तर साफ सफाई करण्यासाठी प्रशासनाचे दुर्लक्ष तर १० वर्षा सिंचन तलावासाठी कुठलाच निधी उपलब्ध नसल्याची माहिती प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आज सांगितले आहे तर आज आली प्रशासनाला जाग तलावाच्या पाळूवरती पंढलेल्या भोगदा पाहाण्यासाठी आलेल्या, जलसंधारण अधिकारी निलमवार, तर डी. एस. अभंगे यांची उपस्थिती

**सदरील हि बातमी समजताच**

गावचे,सरपंच शिवसाब आप्पा मठपती, उपसरपंच संभाजी पाटील माळेगावे, तलावाकडे झेप घेऊन घटनास्थळी घटना पाहून तात्काळ सिंचन तलावाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळून अधिकारी येतांच काम चालू करण्यात आले व ग्रामपंचायत माध्यमातून काम पुर्ण झाले असल्याचे चित्र दिसून आले आहे सर्व गावातील ग्रामस्थ

निवळी गावांचे सोसायटी चेअरमन भास्करराव पाटील नेवळे,माजी सरपंच गणेश पाटील नेवळे,गावचे पोलिस पाटील बालाजी वाघमारे,पत्रकार पपु निवळीकर व इतर पाहणी करताना



# सेलू येथे संतशिरोमणी श्री.संत सेना महाराज पुण्यतिथी उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी:- महेश राऊत**

दिनांक 20 /08 /2025 बुधवार रोजी संत शिरोमणी श्री संत सेना महाराज यांची पुण्यतिथी श्री संत सेना महाराज मंदिर शाहूनगर ,सेलू येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी 7 वाजता महापूजा व आरतीने झाली. त्यानंतर 11 ते 1 या वेळेत ह.

भ.प.अशोकानंद महाराज यांचे श्री संतसेना महाराज चरित्रपर प्रवचन झाले.दुपारी 1 ते 3 या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास . (मा.नगराध्यक्ष) विनोदराव बोराडे,(मा. उपनगराध्यक्ष) प्रभाकर सुरवशे (मा.नगरसेवक) मिलिंद सावंत,(शहराध्यक्ष शिवसेना)मनीष कदम,(मा. सभापती,कृ.उ.बा.स)दिनकर वाघ, ( मा.जि.प सभापती परभणी) अशोकनाना काकडे, (शहराध्यक्ष भाजपा) गणेशराव काटकर, (मा.तालुकाध्यक्ष,भाजपा) अशोक अंभोरे, (तालुकाध्यक्ष,म.रा.प्रा. शि.सं,सेलू)अमोलराव निकम (विभागप्रमुख, नूतन महाविद्यालय,सेलू)प्रकाशराव कंठाळे, तसेच विविध क्षेत्रातील अनेक प्रतिष्ठित व्यक्तींनी भेट देऊन संत सेना महाराज यांना अभिवादन केले.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र नाभिक महामंडळ शाखा सेलू , श्री.संतसेना महाराज बचतगट ,सेलू व समस्त नाभिक समाज बांधवांनी परिश्रम घेतले.




## अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ मदत द्या

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**


राळेगाव :-विधानसभा क्षेत्रात ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने शेतातील पिके खरडून गेली आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.त्याच प्रमाणे अनेक गावांमधील घरांमध्ये पुराचे पाणी घुसल्याने अन्नधान्यासह जीवनावश्यक वस्तूंची नासाडी झाली आहे,घरांची पडझड झाली आहे.त्यामुळे राळेगाव विधानसभा क्षेत्रातील राळेगाव, बाभुळगाव,कळंब तालुक्यातील अतिवृष्टी ग्रस्तांचे सर्व्हेक्षण करून त्यांना तत्काळ नुकसान भरपाई म्हणुन आर्थिक मदत द्यावी अशी मागणी मनसेच्या वतीने जिल्हाउपाध्यक्ष शंकर वरघट यांच्या नेतृत्वात उपविभागीय अधिकारी राळेगाव यांच्याकडे मार्फत मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली.यावेळी यश ढोकणे, गौरव राऊत, अक्षय परिसे, स्वप्निल नेहारे, सुहास उमाटे, राज नागपुरे, अंकित चौधरी, मोहित भोयर, सुमित धोटे, सुरज माणेकर, निलेश चौधरी, रोशन पयघन, करण आमटे, अमर ढोक, सचिन आत्राम, करण नेहारे,अमर कांबळे,दर्शन पाडवार,गणेश शेंडे, सुजल कुळसंगे,अमर मेश्राम,करण मेश्राम,ओम कोयरे,प्रीतम सोडे, शेतकरी आणी महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.



# अंगावर टॅटू काढताना सावधान : शिकार व्हाल अनेक रोगांचे.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी**

आजच्या तरुणाई मध्ये टॅटूची खूप क्रेझ आहे .अनेक तरुण-तरुणी शरीरावर विविध ठिकाणी टाकू काढायला पसंती दर्शवतात.फॅशन म्हणून किंवा स्वतःची ओळख दाखवण्यासाठी टॅटू काढले जातात. काहीजण टॅटूच्या माध्यमातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करतात, ही एक कला आहे.



टॅटू काढणे ही फॅशन ,स्टेटमेंट व स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्याचा मार्ग आहे. परंतु आकर्षक टॅटू मध्ये आरोग्यालाही धोका दडलेला आहे. हे अनेकदा दुर्लक्षित होत आहे अस्वच्छ स्टुडिओ,त्याच प्रमाणे अप्रशिक्षित आर्टिस्ट यामुळे हिपॅटायसिस, बी.सी., एचआयव्हीसह रक्ताद्वारे पसरणारे गंभीर आजार होऊ शकतात. तरुणांमध्ये व्यक्तिमत्व वेगळे दाखवण्यासाठी टॅटू लोकप्रिय बनला आहे. सोशल मीडियावर टॅटू डिझाईन ट्रेडिंग आणि फॅशन सोबतच बॉडी आर्टचा एक भाग म्हणून तरुणाई कडून स्वीकारला जात आहे. टॅटू स्टुडिओ करण्यासाठी स्थानिक प्रशासन व आरोग्य विभागाची परवानगी आवश्यक असते. आर्टिस्टने प्रशिक्षण घेतलेले आहे का ?याची खात्री करावी. स्टुडिओत स्वच्छता पाळली जाते का? नवीन सुईचा वापर होतो का? उपकरणांचे योग्य निर्जंतुकीकरण केले जाते का ?वापरली जाणारी शाई प्रमाणित आहे का? या गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे. रक्ताद्वारे पसरणाऱ्या हिपॅटायसिस, बी.सी व एचआयव्ही आजाराचा धोका असतो, तसेच त्वचेवर सूज, लालसरपणा व अलर्जी होण्याची शक्यता अधिक असते. संसर्ग झाल्यास किंवा पू किंवा फोडी होण्याची शक्यता असते, असे तज्ञ सांगतात. टॅटू काढल्यानंतर काढलेल्या भागावर स्वच्छ पट्टी लावावी. काही दिवस टॅटू वर थेट पाणी लावू नये. डॉक्टरांनी सुचवलेल्या मलमा चा वापर करावा .खाजवणे किंवा खरवडणे टाळावे, थेट उन्हात किंवा प्रदूषणात उघडा टॅटू ठेवू नये .असा सल्ला त्वचारोग तज्ञ देत आहेत .टॅटू काढणे जरी फॅशन असली तरी त्यात स्वच्छता व सुरक्षिततेचे नियम पाळणे महत्त्वाचे आहे अन्यथा गंभीर आजारांचे आपण बळी ठरू शकतो.

**अनेकजण ती कलेच्या दृष्टिकोनातून पाहतात.**

टॅटू काढणे ही एक कायमस्वरूपी प्रक्रिया आहे. त्यामुळे कोणताही टाकू काढण्यापूर्वी विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे टॅटू काढताना त्वचेला संसर्ग होण्याची शक्यता असते त्यामुळे योग्य ती काळजी घेणे गरजेचे आहे काही ठिकाणी विशेषता सरकारी नोकरीमध्ये टॅटूमुळे अडचणी येऊ शकतात त्यामुळे टॅटू काढण्यापूर्वी या गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे . टॅटू काढणे ही एक वैयक्तिक निवड आहे .तरुणाई मध्ये टॅटूची आवड वाढत असताना टॅटू काढण्यापूर्वी फायदे तोटे आणि आरोग्याच्या दृष्टीने विचार करणे तेवढेच आवश्यक आहे.

# रस्ते कुत्र्यांपासुन मुक्त- सुप्रीम कोर्ट

## देशात भटकी कुत्री घेतात रोज अकरा हजार जणांना चावा दिल्लीचे झाले... गल्लीचे काय..

### वादावर संवेदनशील संवाद - प्राणी अभ्यासक डॉ. संतोष पाटील( सिल्लोड) यांचे सोबत

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**प्रश्न- (प्रतिनिधी ) -** एक प्राण्यांचे अभ्यासक म्हणून सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयाकडे कसे बघता

डॉ. पाटील -दिल्लीतील रस्ते भटक्या कुत्र्यांपासुन मुक्त करून ती शेल्टर होम ( निवारा गृह) मध्ये स्थलांतरीत करण्याचे निर्देश मा. सर्वोच्च न्यायालयाने दिले ते स्वागतार्ह आहेचं कारण प्राणी प्रेम जितके महत्वाचे तितकीच मानवी सुरक्षा देखील काकनभर अधिक महत्वाची आहे.



*कुत्र्यांची देहबोली ( बॉडी लँग्वेज ) समजून घ्या* - कुत्री जेव्हा चावण्याच्या “मूड” मध्ये येतात तेव्हा त्यांचे कान ताठ होऊन मागच्या दिशेने ( शरीर समांतर जातात ), त्यांचे शरीर ताठ बनते, ओठ,जबडा मागे ताणला जातो. समोरील पाय थोडे खाली झुकतात, चेहऱ्यावर सुरकुत्या निर्माण होतात.शेपटी वर जाते.

(प्र.) *भटकी कुत्री , वन्यजीव व मानव यांचा कसा संबंध येतो*- :- हे सर्वचं घटक जैवविविधतेचे घटक आहेत. मानव सुद्धा जैवविविधतेचा सर्वात मोठा घटक आहे. अंदमान/ निकोबार बेटावरील जारवा व सेंटीनल या आदिम जाती कायद्याने संरक्षित केल्या आहेत, प्रगत मानवाने त्यांच्या जवळ जाऊ नये म्हणून निर्बंध घालण्यात आले आहेहे याचे उदाहरण आहे.भटकी कुत्री वन्यजीव या श्रेणीत येत नाही मात्र जैवविविधतेचा घटक आहेत.

(प्र ) *न्यायलयाने हा धक्कादायक निर्णय का घेतला* - --काही दिवसापूर्वी दिल्लीत एका निष्पाप बालकाचा भटक्या कुत्र्याने चावा घेतल्याने रॅबिस हा प्राणघातक आजार होऊन मृत्यू झाला व न्यायालयाने हि बाब गांभीर्याने घेतली, त्यातच दिल्ली व परिसरात 1 लाखा हुन अधिक भटकी कुत्री असल्याचे व त्यांपासून नागरिकांना त्रास होतोय हे कोर्टाने जाणून घेतले, त्यामुळे कोर्टाने हा आदेश सरकारला दिला.

(प्र ) *भारताची कुत्रे व रॅबिस याबाबत सद्यास्थिती काय आहे*- -: - जगात सर्वात जास्त भटकी कुत्री भारतात आहेत. 2019 च्या पशु गणणे नुसार देशात दीड कोटी कुत्री होती, ती संख्या आता नक्कीच वाढून ती एक कोटी साठ लाख झाली असेल.2024 मध्ये देशात कुत्रा चावण्याच्या 38 लाख घटना घडल्या, ज्या जगात सर्वाधिक आहेत. लॉन्सेटच्या मते देशात दरवर्षी 20 हजार मृत्यू कुत्रा चावून रॅबिज झालेने होतो. जागतीक रॅबिज ग्रस्तापैकी 36 टक्के रुग्ण हे भारतातील असतात. देशात दररोज 11 हजार नागरिकांना कुत्रा चावण्याच्या दुर्धर प्रसंगास नाहक, काही चूक नसतांना सामोरे जावे लागते.नागरिकांनाचं नव्हे शेतकऱ्यांच्या पाळीव जनावरांवर देखील असा प्रसंग ग्रामीण भागात ओढवतो व हि जनावरे रॅबिसला बळी तरी पडतात किंवा त्यांवर त्या दृष्टीने उपाय करावे लागतात व मोठा आर्थिक भुदंड सोसावा लागतो.

(प्र ) -,*कुत्रा चावणे हे फक्त रॅबिज पुरते मर्यादित आहे का* - स्कॅबीज टू रॅबिज असा हा उदपव्याप आहे.भटक्या कुत्र्यांच्या संपर्काने मानवास स्युडोस्कॅबीस हा त्वचारोग तर होतोच, सोबत कॅनॉईन मेंज हि जगात नोंद झाला आहे. त्यांच्या अंगावरील गोचिड ( टिक्स ) या विविध आजाराच्या वाहक आहेत व त्यांच्या चावण्याने भारतात टायफस फिवर, रेलॅपसिंग फिवर, क्यासामोर फॉरेस्ट डिसिज नामक आजार हि होतात. शिवाय कुत्री वाहणांच्या मागे लागून लक्षावधी अपघात देशात घडतात.

कुत्रा चावला तरच रॅबिजची भीती असे नाही. त्यांची नखे लागून ओरखळने व त्यांची लाळ हि मानवी शरीराच्या त्वचेच्या उघड्या पडलेल्या भागाच्या संर्पकात आल्याने रॅबिज च्या घटना जगात घडल्या आहेत. मागच्या महिन्यात अमेरिकेत मोराक्को येथे यऊनी फोर्ड या महिलाचा फक्त नख लागून रॅबिज होऊन मृत झाला आहे.

(प्र) *या भटक्या जीवांचा मानवावरील हल्ला टाळता येईल का* - लहान मुलांमध्ये डॉग बाईटच्या घटना अधिक घडतात. या साठी मुलांच्या आसपास वावरणाऱ्या कुत्र्यां कडे लक्ष ठेवावे, तसे मुलांनाही सांगावे. कुत्र्यांना त्यांची” स्पेस “ हवी असते,त्या जागेत मुलांनी जाऊ नये. अपरिचित कुत्र्यां जवळ जाऊ नये व जाण्याचा प्रसंग आल्यास शांत, स्थिर ( झाडा प्रमाणे ) उभे राहावे. कुत्र्यांच्या डोळ्यात डोळे घालून बघू नये, त्यामुळे त्यांना असुरक्षतेचि भावना निर्माण होते व ते चावण्याचा प्रयत्न करतात. त्यांना बघून पळू नये. त्यांना गती सहन होत नाही.जेव्हा ती झोपलेली असतात, पिलां जवळ असतात व जेव्हा ती काही खात असतात,( विशेषतः मांस) तेव्हा त्यांना हटकू नये. यातून आपण बऱ्याच प्रमाणात डॉग बाईट टाळू शकतो.


न्यायालयाच्या या निर्णयाने हा प्रश्न सुटला असा अन्व्यार्थ निघतो का* - -- नाही, शेल्टर होम हा एकमेव उपाय नाही. कुत्र्यांचे निर्बीजीकरण/ नसबंदी ( स्टरलायझेशन )करणे हा विकल्पहि अवलंबवावा लागेल.शेल्टर होम मध्ये हि त्यांचे नैसर्गिक प्रजनन होणारचं.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# अतिवृष्टी मुळे उमरखेड तालुक्यात अतोनात नुकसान शेतकऱ्यांची प्रशासनाला तात्काळ मदतीची मागणी

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी / राजू गायकवाड**



उमरखेड तालुक्यात मुसळधार पासून सातत्याने पडत असल्याने शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले आहे १५ व १६ ऑक्टोबरला तालुक्यात ढगफुटीमुळे अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी कर्ज काढून उभा केलेला पीकपेरा डोळ्यादेखत वाहून गेला असून, तालुक्यातील ४७ हजार ५६० हेक्टर क्षेत्रातील पिके बाधित झाली आहेत. यात तब्बल ५२ हजार ३४० शेतकरी संकटात सापडले आहेत.
या अतिवृष्टीत ४४ गावे बाधित झाली असून तब्बल २७०९ कुटुंबे उघडयावर आली आहेत. घरांची पडझड, जनावरे वाहून जाणे, पाण्याखाली गेलेली शेती आणि उद्ध्वस्त संसार या साऱ्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले गेले आहेत.धरणातून पाणी सोडल्याने पैनगंगा नदीला पूर आला आणि नदीकाठच्या गावांतील शेतजमिनी पाण्याखाली गेल्या. सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मुग, ज्वारी, ऊस, हळद, केळी तसेच फळबागांचे अतोनात नुकसान झाले आहे. पोफाळी, मुळावा, तरोडा, जनुना, पळशी, दिवट पिंपरी, हातता, झाडगाव, वानेगाव, अंबाळी, नागापूर, बेलखेड, दहागाव, सुकळी, नागरवाडी, चिंचोली, देवसरी, लिंबगव्हाण, कोत्रा, मानकेश्वर, कारखेड, लोहरा, सावळेश्वर, गाडी बोरो, मुरली, परोटी, बेरडी, दराटी, ढाणकी, बिटरगाव अशा शेकडो गावांमध्ये शेतकऱ्यांचे उत्पन्न मातीमोल झाले आहे. दरम्यान, सततच्या पावसामुळे पूल वाहून गेले, ओढ्या-नाल्यांवरील बंधारे तुटते. रेल्वेच्या कामामुळेही शेतकऱ्यांच्या शेतीत पाणी गेले आहे. सध्या उमरखेड तालुक्यातील १४१ गावांपैकी धनज,मोहदरी,मुळावा, कुपटी, उमरखेड, विडूळ, दराटी, ढाणकी, निंगपुर, चातारी, बिटरगाव मंडळात पुराचा सर्वाधिक तडाखा बसला आहे. शेतकऱ्याचे तात्काळ पंचनामे करून सरसकट आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे.

ढगफुटी च्या पाऊसामुळे माझ्या 2 एकर शेतातील संपूर्ण कापूस वाहून गेला आहे माझ्या सहित धनज - मोहदरी गावातील शेकडो शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे शासनाने त्वरित मदत जाहीर करून नुकसान भरपाई देण्यात यावी अन्यथा शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे.
**संजय कुबडे**
**शेतकरी मोहदरी**

# गुगुळ पिंपरी त ग्रामपंचायत कार्यालय समोर दिव्यांगाचे बोंबाबोंब आंदोलन

**प्रशांत टाकसाळ**
**प्रतिनिधी गुगुळ पिंपरी हिंगोली**

गुगुळ पिंपरी तालुका सेनगाव जिल्हा हिंगोली 20 ऑगस्ट ते 21ऑगस्ट रोजी दिव्यांग भव्य क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य शाखा गुगुल पिंपरी च्या वतीने गुगुल पिंपरी समोर दिव्यांकांच्या प्रमुख मागण्या च्या अनुषंगाने बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले सेनगाव तालुक्यातील गुगुल पिंपरी येथे सन 2018 ते 2025 पर्यंत चा पाच टक्के निधी अपंगाचा ग्रामपंचायत च्या वतीने वितरीत करण्यात आला नाही तो दिव्यांगाना वितरीत करण्यात यावा सर्व दिव्यांगाना योजनेच्या शिधापत्रिका देण्यात यावे दिव्यांग बांधवांना व महिलांना व्यवसायासाठी जागा उपलब्ध करून देणे दिव्यांग शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी करणे व सर्वांना घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी सर्व विविध प्रमुख मागण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय गुगुळ पिंपरी समोर दिव्यांग महिला व बांधवांच्या वतीने दोन दिवस दिनांक 20 ऑगस्ट ते 21 ऑगस्ट रोजी बोंबाबोंब आंदोलनात गावातील सर्व दिव्यांग महिला व बांधव समवेत प्रामुख्याने. गौतम पाईकराव ,सुमित्रा कानडे, गोदावरी मगर, वैशाली शेजुळे, गोपाल शिंदे, सराबाई लोखंडे, नामदेव इंगोले, गजानन इंगोले, नारायण खोडे, गौतम इंगोले, रमेश पाईकराव, निळोबा तायडे, सुरेश पंडितकर, विश्वनाथ खोडे, दत्तराव खोडे, लक्ष्मण मुडे, नागो मोरे, गजानन खोडे, बाळू तायडे, आकाश धोत्रे, संकेत मोरे, श्रद्धा खोडे, आकाश बांगर



# तिवरे गावचे वै.ह.भ.प. श्री महादेव काशिबा दळवी बोवा यांच्या शताब्दीपूर्ती पुण्यस्मरण वर्षानिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन व आरोग्यदायी साहित्य वाटप

**दैनिक युवक आधार**
**राजापूर:- (प्रमोद तरळ)**

कोकणातील वारकरी संप्रदायाचे जनक व जनमाणसात भक्ती-साधनेचा प्रसार करणारे थोर संत, रत्नागिरी जिल्ह्याच्या राजापूर तालुक्यातील, तिवरे गावचे वै. ह. भ. प. श्री महादेव काशिबा दळवी बोवा यांचे हे शताब्दीपूर्ती पुण्यस्मरण वर्ष असून, त्यांच्या पवित्र स्मृतीप्रीत्यर्थ वै. ह. भ. प. श्री महादेव काशिबा दळवी बोवा संस्थेच्यावतीने आदर्श विद्यामंदिर वाटूळ, माध्यमिक विद्यामंदिर, ओझर येथे 'वक्तृत्व' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. इयत्ता पाचवी ते सातवी (किशोर गट) व आठवी ते दहावी (कुमार गट) अशा दोन गटांत ही स्पर्धा पार पडली.

दोन्ही गटांतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे व प्रशस्तीपत्रे देऊन गौरविण्यात आले.

आदर्श विद्या मंदिर, वाटूळ विजेते कुमार गट (८वी ते १०वी) प्रथम क्रमांक:- कु. मृण्मयी रुपेश चव्हाण
द्वितीय क्रमांक:- कु. राखी जनार्दन घाडी व कु. सिद्धी गावखडकर, तृतीय क्रमांक:- कु. वैदही मांडवकर व कु. निरिजा राजापकर, किशोर गट (५वी ते ७ वी) प्रथम क्रमांक:- कु. मधुरा चव्हाण द्वितीय क्रमांक:- कु. ओम उदय यादव
तृतीय क्रमांक:- कु. सार्थक चव्हाण व कु. वैदही साबळे,

माध्यमिक विद्यामंदिर, ओझर विजेते



(कुमार गट- ८वी ते १०वी) प्रथम क्रमांक:-कु. तहुरा अल्लाउद्दीन हसोळकर, द्वितीय क्रमांक:- कु. पूर्वा पांडुरंग पळसमकर, तृतीय क्रमांक:- कु. दिया मंगेश गुरव,

या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी आदर्श विद्यामंदिर, वाटूळचे मुख्याध्यापक श्री. संदिप मयेकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. आनंद त्रिपाठी तसेच माध्यमिक विद्यामंदिर, ओझरचे मुख्याध्यापक श्री. मुरलीधर खानविलकर यांनी विशेष मेहनत घेतली.

दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी संपन्न झालेल्या बक्षीस वितरण समारंभास संबंधित शाळांच्या संस्थेचे पदाधिकारी श्री. विश्वास चव्हाण (अध्यक्ष), श्री. विजय चव्हाण (शाळा समिती अध्यक्ष) व ओझर ग्रामपंचायतीचे प्रथम नागरिक श्री. विकास रेगे, दळवी बोवा संस्थेचे अध्यक्ष श्री. नामदेव दळवी, सचिव श्री. प्रसाद दळवी, पदाधिकारी श्री. तुकाराम दळवी, श्री. प्रकाश दळवी, सौ. सुवर्णा दळवी व सौ. श्रद्धा दळवी तसेच परिसरातील इतर मान्यवर उपस्थित होते. याच दिवशी दळवी बोवा संस्थेच्यावतीने एकूण-०६ जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना आरोग्यदायी साहित्याचे वाटप करण्यात आले. यात वाटूळ शाळा क्रमांक:- १ व ४, प्राथमिक शाळा ओझर, प्राथमिक शाळा कोंड-तिवरे, प्राथमिक शाळा शिरवली व प्राथमिक शाळा कुरंग या शाळांचा समावेश होता.

दळवी बोवा संस्थेच्या या स्तुत्य उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत असून, संस्थेच्या कार्याबद्दल स्तुतिसुमने उधळली जात आहेत.

# निफाड तालुक्यात संततधार पावसाची हजेरी, रस्तावर झाड कोसळे

## खरिपाच्या पिकांना दिलासा

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

निफाड तालुक्यात संततदार पावसाने हजेरी लावल्याने सोयाबीन, मका उत्पादक सुखावले असून संततधार पावसाने मात्र जनजीवन विस्कळीत झाले होते सायंकाळी चार वाजेच्या दरम्यान निफाड उगाव रस्त्यावर झाड पडल्याने काही काळ वाहतुकीला अडथळा निर्माण झाला होता मात्र पडलेले झाड तातडीने दूर केल्यानंतर वाहतूक सुरळीतपणे सुरू झाली

निफाड तालुक्यामध्ये 2 ऑगस्ट ते 13 ऑगस्ट या दरम्यान पावसाने दांडी मारल्याने सोयाबीन उत्पादकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले होते या 12 दिवसांमध्ये कडकडीत ऊन पडत असल्याने सोयाबीनला विहिरीचे पाणी भरावे लागते की काय या चिंतेत शेतकरी होते परंतु त्यातही काही शेतकऱ्यांनी विहिरीच्या पाण्याने सोयाबीन भरले होते मागील तीन ते चार दिवस तालुक्यात कुठे न कुठे पाऊस कमी जास्त प्रमाणात हजेरी लावत होता ,परंतु सर्वत्र पाऊस झाला नव्हता

काल दि 20 रोजी कोटमगाव खानगाव ,वनसगाव , उगावं, या गावांना पावसाने झोडपले होते




मंगळवारी रात्रीही मध्यम स्वरूपाचा पाऊस पडत होता मात्र बुधवार दिनांक 21 रोजी सकाळपासून संततधार पावसाने तालुक्यात सुरुवात केली हा पाऊस जवळजवळ दुपारी 4 वाजेपर्यंत पडत होता या पावसाने निफाड ,जळगाव ,काथरगाव ,कोठुरे ,गोंडेगाव ,चांदोरी, सायखेडा, मांजरगाव ,खानगाव थडी, नांदूरमध्यमेश्वर, गाजरवाडी, नैताळे धारणगाव वीर ,धरणगाव खडक यासह जवळजवळ गावात पावसाने हजेरी लावली या पावसामुळे जनजीवन पूर्णताहा विस्कळीत झाले होते उद्योग व्यवसायावर परिणाम झाला होता या पावसामुळे खरिपाच्या पिकांना पोषक ठरला आहे त्यामुळे बळीराजा सुखावला आहे

# आसेगाव पोलीस स्टेशन परिसरात अवैध दारू गुटखा विक्री.! ठाणेदार घेत आहेत झोपेचं सोंग.




**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

मंगरूळपिर तालुक्यातील आसेगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या 50% खेड्यामध्ये तसेच आसेगावात ठीक ठिकाणी मिळते देशी भिंगरी गावठी दारू वरून खुलेआम गुटखा विक्री होत असल्याची तक्रार सर्वच ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. आसेगाव सर्वच बाबतीत अव्वल आहे. तसेच दोन नंबरच्या धंद्यातही अव्वल आहे. युवक व्यसनाधिकडे वळत असल्याचे तक्रारीत नमूद आहे.संभाव्य अनुचित घटना टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी यावर नियंत्रण मिळवण्याची मागणी करण्यात आलेली आहे.मंगरूळपिर तालुक्यातील आसेगाव ग्रामीण बाजारपेठ आहे. या ठिकाणी विविध खेडेगावाचे लोक विविध कामासाठी दर दिवशी येत असतात.त्यामुळे या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने पोलिसांसह सर्व संबंधित यंत्रणांकडून योग्य उपाययोजना होणे आवश्यक आहे.परंतु तसे होत नाही. नावालाच बंदी अवैध धंद्याची संधी अवैध धंद्याची कलाच न्यारी आसेगाव भागातही सुरू दुकानदारी.त्यामध्ये थेट पोलिसांची भागीदारी.अशातला हा प्रकार दिसून येत आहे.तथापि या ठिकाणी अवैध दारू विक्री सह प्रतिबंधित गुटख्याची सुद्धा खुली विक्री होत असल्याची सामान्य जनतेत खमंग चर्चा आहे. या गावठी दारू वाल्यांना व गुटखा वाल्यांना नेमका कोणाचा आशीर्वाद समजायचे असा प्रश्न उपस्थित होतो.?

# जिल्हाधिकाऱ्यांकडून पूरग्रस्त गावाची पाहणी

## पंचनामे, उपाययोजना, नागरिकांच्या आरोग्यासंदर्भाने घेतला आढावा

**दैनिक युवक आधार**
**उदगीर तालुका प्रतिनिधी**
**बालाजी तेलंग**

उदगीर तालुक्यातील बोरगाव बुद्रुक, घडकनाळ, टाकळी या गावांत रविवारी (ता. १७) पुराचे पाणी शिरले होते. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. जिल्ह्यात फक्त अतिवृष्टीचा फटका बसून, पूर आलेले एकमेव हे गाव असून, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी पूरग्रस्त गावाला भेट दिली. यावेळी त्यांनी पंचनामे, उपाययोजना, नागरिकांच्या आरोग्यासंदभनि आढावा घेत अधिकाऱ्यांना सुचना केल्या.
जिल्हाधिकाऱ्यांनी बुधवारी (ता.२०) पूरग्रस्त भागातील शेती, गावातील बाधित घरे याबाबतची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी उदगीर तालुक्यामध्ये



सर्वाधिक बाधित असलेल्या बोरगाव या गावांमध्ये प्रशासनाची बैठक घेऊन मागील दोन उदगीर तालुक्यातील बोरगाव, धडकनाळ, टाकळी या गावांत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी भेट दिली. तसेच नुकसानीची पाहणी करून अधिकाऱ्यांना सूचना केल्या.
दिवसांत प्रशासनामार्फत करण्यात आलेले पंचनामे, उपाययोजना, नागरिकांच्या आरोग्य यासंदभनि आढावा घेतला. यावेळी जिल्हास्तरीय विभागप्रमुख तसेच तालुकास्तरीय सर्व अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी उदगीर येथील विविध सेवाभावी संस्था, व्यक्तींनी पूरग्रस्तांना
केलेल्या मदतीबाबत कौतुक केले. बोरगावातील घरांमध्ये साधारणतः तीन ते चार फूट पाणी जमा झालेल्यांपैकी तानाजी धोंडीबा सुभाने, हनुमंत अर्जुन सुभाने, रमेश अर्जुन सुभाने यांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केलो. यावेळी उपस्थित सर्व गावकऱ्यांना प्रशासनाच्या वतीने करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती देऊन त्यांना आश्वस्त केले. यावेळी उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, उपविभागीय कृषी अधिकारी यादव व तालुका कृषी अधिकारी कांबळे आदी उपस्थित होते.

**विद्युतपुरवठा सुरळीत करावा**

प्रशासनाने पीक नुकसानीचे पंचनामे, दगावलेली जनावरे, पडझड झालेली घरे, इतर नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून सानुग्रह अनुदानाचे वितरण पात्र लाभार्थांना लवकर होईल, याची काळजी घेण्याबाबत सूचित केले. बोरगाव, धडकनाळ गावातील विद्युतपुरवठा कोणत्याही परिस्थितीत सुरळीत करण्याची सूचना त्यांनी केली. यावेळी नागरिकांशी त्यांनी संवाद साधत अडचणी जाणून घेतल्या.

# डॉ. श्रीकांत रणखांबे सुवर्णलक्ष राष्ट्रीय क्रीडा पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**( प्रतिनिधी इस्लामपूर / सांगली )**

मेजर ध्यानचंद केंद्रीय क्रीडा परिषद, भारत आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिन नुकताच राजारामबापू नाट्यगृह, इस्लामपूर, जिल्हा सांगली येथे माजी आमदार भगवानराव साळुंखे, महाराष्ट्र केसरी (1978) आप्पासाहेब कदम , ऑलम्पिकवीर बंडा पाटील रेटरेकर , पोलिस अधिकारी गणेश कोंडते या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थित संपन्न झाला. यावेळी मांजर्डे, गावचे सुपुत्र, थोर समाज सेवक, कुस्तीचे आधारस्तंभ डॉ. श्रीकांत सीताराम रणखांबे यांना त्यांच्या कुस्ती खेळातील भरीव योगदानाबद्दल महाराष्ट्र केसरी आप्पासाहेब कदम यांच्या हस्ते सुवर्णलक्ष राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार 2025 देऊन गौरवण्यात आले.




क्रीडा क्षेत्राला एक नवी दिशा देणारे, राष्ट्रीय कुस्ती संघटक डॉ. श्रीकांत सीताराम रणखांबे, यांचे कुस्ती या खेळात योगदान अतुलनीय आहे. त्यांनी अनेक कुस्ती मैदानांचे सातत्याने आयोजन करून अनेक कुस्ती मैदानांना आधार देऊन सहकार्य केले आहे, त्यांचे कुस्ती खेळ वाढवण्यासाठी आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे मोलाचे महान कार्य केले आहे. क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या उदात्त कामगिरीमुळे महाराष्ट्राचे नाव उंचावले आहे. देश भरातून नामवंत मल्लांना गावच्या कुस्ती आखाड्यात सातत्याने ते आणत आहेत. मल्लांच्या स्नेह भोजनाची सोय ते करीत आहेत.
अनेक वर्षांपासून प्रथम क्रमांकाचे ते बक्षीस लावत आहेत. अनेक मल्लांच्यावर ऑपरेशनचे मोफत उपचार करून त्यांनी आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. शिक्षण, वैद्यकीय , सामाजिक क्रीडा आदी अनेक क्षेत्रात त्यांचे भरीव योगदान आहे. त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वांना आनंद झाला असून राणाप्रताप क्रीडा व्यायाम संस्था, दिनकरदादा युवाशक्ती, आर. आर. पाटील एज्युकेशन ट्रस्ट, राजे उमाजी नाईक मंडळ, नवतरुण बौद्ध विकास मंडळ, बौद्ध विकास मंडळ मुंबई, कवी कट्टा ग्रुप कल्याण मुंबई, रमाबाई महिला मंडळ, बौद्ध साहित्य परिषद महाराष्ट्र राज्य सह जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात अभिनंदनाचा त्यांच्यावर वर्षाव होत आहे .यावेळी देशभरातून क्रीडा क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. अध्यक्ष विठ्ठल कालेल, सुभाष भंडारे आदीसह मेजर ध्यानचंद केंद्रीय क्रीडा परिषद, भारत यांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केला.

# शेतकरी बांधवांची पोळा सणासाठी जोरदार खरेदी

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

विंचूर :-पोळा सण जवळ आला की, शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसू लागतो. वर्षभर शेतात राबून, आपल्या कुटुंबाचे पोट भरणारे शेतकरी, या दिवशी आपल्या जीवाभावाच्या मित्रासाठी, म्हणजेच बैलांसाठी, विशेष तयारी करतात. पोळ्याची खरेदी म्हणजे केवळ वस्तूंची खरेदी नव्हे, तर ती एक भावना आहे, एक कृतज्ञता व्यक्त करण्याचा क्षण आहे.
गावातली बाजारपेठ या दिवसात गजबजून जाते. रंगीबेरंगी वेसण, गोंडे, घुंगरू, मखमली झूल आणि चमचमणारे शिंगटोपण यांसारख्या वस्तूंचे दुकाने लागलेले असतात. शेतकरी आपल्या बैलांना सोबत घेऊन बाजारात जातात आणि मोठ्या उत्साहाने त्यांच्यासाठी निवड करतात. वेसनांचे रंग, गोंड्यांची लांबी, घुंगरूंचा आवाज... प्रत्येक गोष्ट काळजीपूर्वक निवडली जाते. आपल्या मुलांसाठी कपडे निवडताना जसा आनंद होतो, तसाच आनंद त्यांना आपल्या बैलांसाठी वस्तू निवडताना होतो.
पोळ्याच्या खरेदीचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे बैलांसाठी लागणारे खाद्यपदार्थ.



पुरणपोळी, भाकरी, कडधान्ये यांसारख्या पदार्थांची खरेदी केली जाते. वर्षभर कष्ट करणाऱ्या या मुक्या प्राण्यांना गोडधोड खायला घालण्याचा हा दिवस. शेतकरी मोठ्या प्रेमाने आपल्या बैलांना सजवतात आणि त्यांना खाऊ घालतात.
ही खरेदी केवळ भौतिक वस्तूंची नसते, तर ती वर्षभर केलेल्या कष्टाचे फलित असते. शेतकरी आणि बैल यांच्यातील अतूट नाते यातून दिसून येते. पोळा सण हा त्यांच्या नात्याचा उत्सव आहे. या दिवशी बैलांचे पूजन केले जाते, त्यांची मिरवणूक काढली जाते. हे सर्व पाहून प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या कष्टाचे सार्थक झाल्याचे समाधान मिळते.
खरेदीचा हा सोहळा शेतकऱ्यांच्या जीवनातील आनंद आणि समाधान दर्शवतो. पोळा सण हा केवळ एक सण नाही, तर तो कृषी संस्कृतीचा, मानवी आणि प्राणी यांच्यातील सहजीवनाचा एक सुंदर आविष्कार आहे.

# पत्रकार रजत चांदेकर यांची जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

जनकल्याण मराठी पत्रकार संघाचे पहिले राज्य व्यापी अधिवेशन नाशिक येथील निसर्ग रम्य वातावरण असणार्या गरुडझेप अँकडमी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले,राळेगांव तालुक्यातील विहिरगांव येथील नवजीवन तालुका प्रतिनिधी व महाराष्ट्र क्रांती न्युज यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी सोशल मीडिया,सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणारे. रजत चांदेकर यांची यवतमाळ जिल्हा अध्यक्ष पदी निवड करण्यात आली,त्याच बरोबर महिला यवतमाळ जिल्हाध्यक्ष रंजना आडे,उपाध्यक्ष प्रमोद मेटांगे,कार्याध्यक्ष वीरेंद्र चौहान, तालुका कार्यकारणी दिग्रस तालुका अध्यक्ष अशोक जाधव,उपाध्यक्ष किशोर कांबळे,उमरखेड तालुका अध्यक्ष अतिश वटाने, महागांव तालुका अध्यक्षसनी चौहान,कळंब तालुका अध्यक्ष पवन जाधव, पांढरकवडा




तालुका अध्यक्ष राजीव आगरकर,यांची सुद्धा निवड करण्यात आली आहे यांची निवड झाल्यामुळे सर्वाकडून शुभेच्छा चा वर्षाव करण्यात आला जनकल्याण मराठी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संतोष जाधव,राष्ट्रीय कार्याध्यक्ष रफिक सैयद,महाराष्ट्र राज्य अध्यक्ष देविदास बैरागी,महिला विभागाच्या राज्य अध्यक्ष मनिषा पवार,राज्य उपाध्यक्ष सुधिर उमराळकर व उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष प्रकाश बागुल यांच्या आदेशानुसार जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या यवतमाळ जिल्हा अध्यक्ष पदी रजत रामाजी चांदेकर यांची नियुक्ती करण्यात आली असून लवकरच ते संपुर्ण जिल्हात जनकल्याण मराठी पत्रकार संघाची जिल्हा कार्यकारिणी जाहीर करतील अशी अपेक्षा व्यक्त केली आहे आणि यवतमाळ कार्यकारणीतील सर्व सदस्या चे स्वागत आणि खुप खुप अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे.कार्यकमाचे यशस्वी नियोजन जनकल्याण मराठी पत्रकार संघाचे नाशिक जिल्हा व नाशिक शहर पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले,या वेळी जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या सर्व पदाधिकारी यांना अपघाती विमा योजना,पत्रकार बांधवांच्या पत्नी साठी पैठणी साडी व आकर्षक भेट वस्तू प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते देण्यात आल्या,कार्यकमाचा अध्यक्षस्थानी जनकल्याण मराठी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संतोष जाधव होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक ग्रामिण पोलीस दलाचे पोलीस उप अधिक्षक वासुदेव देसले,दै महासागर चे संपादक जेष्ठ पत्रकार प्रा जयंत महाजन, जागर जनस्थान चे मुख्य संपादक समिर चव्हाण, गरुडझेप अँकडमी चे व्यवस्थापक प्रा लक्ष्मण डोळस, माजी नगरसेवक दिनकर अण्णा पाटील,दै महासागर चे कार्यकारी संपादक सुधीर उमराळकर, सामाजिक कार्यकर्ते गणेश सावंत अल्पसंख्यांक सेलचे तन्वीर तांबोळी, गुड्डू सय्यद यांच्या सह जनकल्याण मराठी पत्रकार संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष रफिक सैयद, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष देविदास बैरागी, राष्ट्रीय सल्लागार अन्वर पठाण, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रकाश बागुल, नाशिक जिल्हा कार्याध्यक्ष अकिल पटेल, नाशिक जिल्हा महिला विभागाच्या जिल्हा अध्यक्ष वृषाली साळुंकी, नाशिक शहर अध्यक्ष शोहेब शेख यांच्या सह पोलीस मित्र समिती चे राज्य अध्यक्ष आनंद दाणी,दिव्यांग सेवा समिती चे राज्य अध्यक्ष सुकदेव खुर्दळ,अन्याय अत्याचार निवारण समिती चे राज्य अध्यक्ष कल्याणी धोंडगे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.दिप प्रज्वलनाने कार्यकमाची सुरूवात करण्यात आली तर उपस्थित सर्व प्रमुख पाहुणे यांचे जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला. प्रा जयवंत महाजन यांचे पत्रकारिता काल आज आणि उद्या या विषयावर व्याख्यान झाले तर वासुदेव देसले व समिर चव्हाण यांनी पत्रकारिता कशी निर्भीड करावी या विषयावर सविस्तर मनोगत व्यक्त केले,या प्रसंगी जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या प्रत्येक पदाधिकारी यांना अपघाती विमा,भेटवस्तू व त्यांच्या पत्नीसाठी पैठणी साडीचे वाटप करण्यात आले.

## नुकसानग्रस्त पिकांची महसुल विभाग व कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्याच्या शेतात जाऊन पाहणी.

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधीः महादेव उप्पे**

**देगलूर(दि.२२)** देगलूर तालुक्यातील मौजे हणेगाव येथे गेल्या काही दिवसांपासून झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.उभ्या पिकांवर पावसाचा तडाखा बसल्यामुळे कापूस,सोयाबीन,मूग, उडीद,तूर यांसारख्या पिकांची मोठया प्रमाणात हानी झाली आहे.शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर उभे पीक पाण्याखाली गेल्याने शेतकरी वर्ग हतबल झाला आहे. या पार्श्वभूमीवर नुकतेच शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी महसूल प्रशासन व कृषी विभागातील अधिकारी गावात दाखल झाले. ग्राम महसूल अधिकारी महेश पदाजी,सहाय्यक कृषी अधिकारी नवनाथ वलकले,ज्ञानेश्वर बानोरे, सहाय्यक कृषी अधिकारी,तसेच महसूल सेवक अनिल राठोड यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानग्रस्त पिकांची पाहणी केली.या पाहणीदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे उत्पादन घटणार असून शेतकऱ्यांवर कर्जबाजारीपणाची वेळ येऊ नये म्हणून शासनाने तातडीने मदत जाहीर करावी,अशी मागणी शेतकरी व्यक्त करत आहेत. यावेळी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्तरीय पंचनामे करून अहवाल वरिष्ठांकडे सादर करण्याचे काम सुरु असल्याचे कृषी विभागाने व महसूल प्रशासनाने स्पष्ट केले.पुढील काही दिवसांत मदतीचा निर्णय शासनस्तरावर होईल,अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.




## युवक मंडळ शिरवलीचे अध्यक्ष विजय कुळये यांच्या वतीने वाटूळ शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

**दैनिक दैनिक युवक आधार**
**राजापूरः- (प्रमोद तरळ)**

युवक मंडळ शिरवली यांच्या वतीने अध्यक्ष विजय कुळये यांनी मागील अनेक वर्षापासून हाती घेतलेला विद्यार्थी शैक्षणिक साहित्य वाटप २०२५ हा कार्यक्रम वाटूळ शाळेत शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उपस्थित उत्साहात पार पडला

समाजातील काही दानशूर व्यक्तींमुळे सदर कार्यक्रम पूर्ण होत असून वाटूळ हायस्कूलसाठी गरजू विद्यार्थ्यांना गणवेश व वह्या हे आपल्या युवक मंडळाचे अध्यक्ष विजय कुळये यांच्या प्रयत्नाने सारस्वत हितवर्धक मंडळ मुंबई यांच्या माध्यमातून दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ८ ते १० वाजता वाटूळ शाळेमध्ये पार पडला यावेळी कामत सर, मयेकर सर याशिवाय विजय कुळये संदीप सातोपे प्रणय कुडकर आदी युवक मंडळचे कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते सदर शाळेत शिकणारी मुले ही बहुतांश शेतकरी कुटुंबातील आहेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेश वाटप केल्याबद्दल शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीने श्री विजय कुळये तसेच युवक मंडळ शिरवलीचे आभार मानले आहेत



# विक्रोळी पार्कसाईट मध्ये घडलेल्या दुर्दैवी दरड दुर्घनेनंतर मनपा एन विभागाकडून विशेष खबरदारी व उपाययोजनेला सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर,(केतन भोज);**

मुंबई शहरासह उपनगरात गेल्या तीन चार दिवसांपासून सातत्याने जोरदार मुसळधार पाऊस बरसत आहे.या पावसामुळे विक्रोळी पार्कसाईट वर्षा नगर येथील जनकल्याण सोसायटीत राहणाऱ्या मिश्रा कुटुंबाच्या घरावर शुक्रवारी(ता.१५)मध्यरात्री दरड कोसळली.या दुर्दैवी घटनेत साखरझोपेत असलेल्या मिश्रा कुटुंबातील शालू मिश्रा(१९)आणि सुरेश मिश्रा(५०) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.तर आरती मिश्रा(४५) आणि ऋतुराज मिश्रा(२०) हे जखमी झाले होते.या दुर्दैवी घटनेनंतर मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त गजानन बेल्लाळे यांच्यासह संबंधित सर्व अधिकारी आणि स्थानिक प्रशासन यांनी येथील घोकादायक जागेची तत्काळ पाहाणी केली होती. तसेच मनपा एन विभागातर्फे येथील सर्वच डोंगराळ भागातील धोकादायक स्थितीत राहणाऱ्या स्थानिक रहिवाशांना पावसाळ्यात खबरदारी म्हणून सावधान नोटीस देऊन पूर्व सूचना दिली गेली आहे.तसेच विक्रोळी पार्कसाईट वर्षा नगर येथे दरड कोसळून घडलेल्या दुर्दैवी घटनेनंतर उपायुक्त संजय कुमार धोंडे,एन वॉर्डचे सहाय्यक आयुक्त गजानन बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली इमारत व कारखाने विभागाचे सहाय्यक अभियंता विजयकुमार वाघ आणि कनिष्ठ अभियंता विलास जाधव यांनी तत्काळ या घटनास्थळी जाऊन अजून पुढे याठिकाणी कोणत्याही प्रकारची अशी दुर्दैवी घटना घडू नये तसेच पुन्हा दरड कोसळू नये म्हणून विशेष खबरदारी घेऊन त्याठिकाणी उपाययोजना करायला सुरुवात केली आहे. त्यामुळे कनिष्ठ अभियंता विलास जाधव यांच्याकडून दरडग्रस्त भागांमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना करत आहेत. यामध्ये धोकादायक भागांचे सर्वेक्षण केले जात असून त्याठिकाणी योग्यती कार्यवाही केली जात आहे.तसेच कनिष्ठ अभियंता विलास जाधव हे दरड कोसळून दुर्दैवी घडलेल्या मध्यरात्री ही स्वतः त्याठिकाणी सर्व प्रथम घटना स्थळी उपस्थित राहून मदत कार्य करत होते.तसेच स्थानिक सामाजिक कार्यकर्ते मंगेश धावडे हे देखील वारंवार सर्व मनपा प्रशाासनाला सहकार्य करत आहेत.





मनपा एन विभागातील प्रभाग क्रमांक १२३ मधील डोंगराळ भागातील धोकादायक दरड कोसळण्याची शक्यता असलेल्या ठिकाणी विशेष खबरदारी मनपा एन विभाग घेत आहे.नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे,असे आवाहन मनपा एन विभाग पालिका प्रशासनाच्या वतीने स्थानिक नागरिकांना केले जात आहे.

## शिवपुरी येथील ग्रामपंचायतीमध्ये नुकतीच एक महत्तवाची ग्रामसभा पार पडली.

**दैनिक युवक आधार**
**विश्वदीप कांबळे हदगाव नांदेड**

शिवपुरी येथील ग्रामपंचायतीमध्ये नुकतीच एक महत्त्वाची ग्रामसभा पार पडली. या सभेत गावाच्या विकासासाठी आणि समस्यांवर गांभीर्याने चर्चा करण्यात आली.

**सभेतील प्रमुख मुद्देः**

१)मागील सथा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यासाठी माहिती देणे– ग्रामस्तरीय समितीची स्थापना करणे, तसेच विश्ववार लहान गट स्थापन करणे,
१) प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत मंजूर पाकूले पूर्ण करणेबाबत.




४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना वार्षिक कृति आराखडा तयार करणे व वैयक्तिक व सार्वजनिक कामांची निवड करणे
५) संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची प्रधानी अंमलबजावणी करणे.
६) बाल विवाह प्रतिबंध कायदा २००६ ची जनजागृती करणे
७) ग्रामपंचायत करवसुली करणेबाबत

रस्ते दुरुस्तीचे काम लवकरच सुरू करण्याचे निश्चित झाले.
स्वच्छता मोहीम येत्या काही दिवसात हाती घेतली जाईल.
पावसाळ्यापूर्वी नाल्यांची सफाई केली जाईल.
ग्रामविकास आराखडा तयार करून त्यावर अंमलबजावणी केली जाईल.
एकूणच, ही ग्रामसभा गावाच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी महत्त्वाची ठरली.
ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती निवड करणे.
पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवण्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्याचे ठरले.
उपस्थित मान्यवरः
या ग्रामसभेत सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर

**दैनिक युवक आधार**
**राकेश यादव प्रतिनिधी वाडी नागपूर**

**नागपूर,दि. 20 :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत शासकीय टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा जून 2025 मध्ये ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल आज जाहीर करण्यात आला. या परीक्षेचा निकाल परिषदेच्या www.mdcepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रिंट घेता येईल. राज्य परीक्षा परिषदेच्या इंग्रजी 30 श.प्र.मि या परीक्षेत 69.73 टक्के, मराठी 30 श.प्र.मि या परीक्षेत 62.90 तर हिंदी 30 श.प्र.मि या परीक्षेत 80.04 टक्के निकाल लागला आहे. इंग्रजी 40 श.प्र.मि या परीक्षेत 62.63 टक्के, मराठी 30 श.प्र.मि या परीक्षेत 46.83 टक्के तर 30 हिंदी श.प्र.मि या परीक्षेत 40.22 टक्के निकाल लागला आहे. निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून 10 दिवसात परीक्षार्थीने गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी संस्थेतून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी राज्य परिषदेच्या www.mdcepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असे महाराष्ट्र राज्य पीरक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## नागपूर शहर पोलिस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील मद्यविक्री 23 ऑगस्टला बंद

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू प्रतिनिधी नागपूर विभाग**

**नागपूर,** दि. 20 : कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने तान्हा पोळा या सणाच्या दिवशी 23 ऑगस्टला नागपूर शहर पोलिस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील सर्व अनुज्ञप्तीधारक देशी व विदेशी मद्य विक्रीचे दुकाने, बिअर बार, ताडीची दुकाने बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी निर्गमित केले आहे.

नागपूर शहर पोलिस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील सर्व मंजूर व कार्यान्वित असलेल्या सर्व नमुना–ई, नमुना–ई–2, एफएलडब्ल्यु–2, सीएल–2, सीएल–3, एफएल–1, एफएल–2, सीएलएफएलटिओडी–3,एफएल–3,एफएलबीआर–2, व टिडी–1 ही मद्यविक्रीची दुकाने संपूर्ण दिवस बंद राहणार आहेत. या आदेशाचा भंग करणाऱ्याविरुध्द नियमानुसार सक्तीची कार्यवाही करण्यात येईल, असे आदेशात नमूद आहे.

# एरंडोल तालुक्यातील वरखेडी येथे दूर्दैवी घटना....

### एकाच कुटुंबातील 5 जणांना विजेचा झटका लागल्याने दुर्दैवी मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील**



**एरंडोल तालुक्यातील वरखेडी** शिवारात एका शेतात पावरा एकाच कुटुंबातील पाच जणांचा विजेच्या धक्क्याने जागीच मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. यामिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, त्याचा परिवार बुधवारी दि. २० रोजी मध्यरात्री तालुक्यात एरंडोल शहराच्या दिशेने चालला होता. (केसीएन) रस्त्यात वरखेडी परिसरात रस्त्यात वरखेडी येथील शेतकऱ्याच्य शेतातून जात असताना या शेतकऱ्याने आपल्या शेतात वन्यप्राण्यांपासून पिकांचे रक्षण करण्यासाठी शेताभोवती तारेचे कुंपण घालून त्यात वीज प्रवाह सोडला होता. या वीज प्रवाहाची कल्पना नसल्याने, मजुरीसाठी आलेल्या विकास पावरा एकाच याच्या कुटुंबातील ५ व्यक्तींना त्या तारेचा जबर धक्का लागला आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. हा वीजप्रवाह बॅटरीतून सोडण्याऐवजी रोहित्रातून सोडल्यामुळे हि दुर्दैवी घटना घडली असावी अशी माहिती पोलीस सूत्रांकडूनअसावी अशी माहिती पोलीस सूत्रांकडून मिळाली. घटनेत २ मोठे रानडुक्कर देखील मयत झाल्याची माहिती मिळाली आहे. यातून वीजप्रवाह किती जोरात असेल याची कल्पना येते.मृत्यू झालेल्यांमध्ये विकास रामलाल पावरा (वय ३०), त्याची पत्नी सुमन विकास पावरा (वय २५), तसेच त्यांची २ मुले पवन विकास पावरा (वय ४) आणि कंवल विकास पावरा (वय ३) तसेच विकासाची सासू वृद्ध महिला (नाव निष्पन्न नाही) यांचा समावेश आहेमृत्यू झालेल्यांमध्ये विकास रामलाल पावरा (वय ३०), त्याची पत्नी सुमन विकास पावरा (वय २५), तसेच त्यांची २ मुले पवन विकास पावरा (वय ४) आणि कंवल विकास पावरा (वय ३) तसेच विकासाची सासू वृद्ध महिला (नाव निष्पन्न नाही) यांचा समावेश आहे. (केसीएन) तर दुर्गा विकास पावरा (वय दीड वर्षे) हि घटनेतून बचावली आहे. सदर पावरा परिवार हा आंबेवडगाव ता. पाचोरा येथील रहिवासी असून त्यांचे मूळ गाव ता. खटना जि. बऱ्हाणपूर येथील आहे. हृदयद्रावक घटनेमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली असून घटनेची माहिती मिळताच एरंडोल पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, पंचनामा आणि पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. घटनेप्रकरणी शेतमालक बंडू युवराज पाटील (वय ६४, रा. वरखेडी ता. एरंडोल) यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचे काम सुरु होते.तर घटनास्थळी पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक कविता नेरकर, डीवायएसपी विनायक मते, एलसीबीचे निरीक्षक संदीप पाटील, एरंडोलचे निरीक्षक निलेश गायकवाड, एपीआय रोहिदास गबाले यांच्यासह तहसीलदार प्रदीप पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन माहिती जाणून घेतली. एरंडोल पोलीस स्टेशनचे कर्मचारी पंकज पाटील, राजू पाटील, संदीप पाटील यांनी मृतदेह जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे दाखल करण्याकामी रवाना झाले आहे.

## एकरी एक लाखाचे अनुदान द्या,खुतमापूर येथील ग्रामस्थांनी दिली तहसिलदारांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**.तालूका प्रतिनिधी**
**:महादेव उप्पे**

देगलूर(दि.२२) दि.१७ ऑगस्ट २०२५ रोजीच्या मध्यरात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे देगलूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे होत्याचे नव्हते झाले असून शेतातील पिकांची मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे.देगलूर तालुक्यातील मौजे हणेगाव येथील नाल्यातील पाणी व कामाजीवाडी येथील तळ्यातील सांडवा उलतल्यामुळे मौजे खुतमापूर येथील नाल्याच्या आजूबाजूला असलेल्या शेतातील पिके खरडून गेले असल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.




त्यामुळे खुतमापूर येथील शेतकऱ्यांनी तहसिल कार्यालय गाठून तसेच उपजिल्हाधिकारी कार्यालय येथे भेट देऊन आपल्या शेतात झालेल्या मोठ्या नुकसानीची माहिती देऊन शेतीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना किमान एकरी एक लाख रुपयाचे अनुदान देण्यात यावे असे निवेदन दिले.

यावेळी खुतमापूर येथील माजी सरपंच प्रतिनिधी नंदकुमार वलकले,गजानन पाटील यांनी तहसिलदार भरत सुर्यवंशी यांना निवेदन दिले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# विक्रम साबळे फाउंडेशन आयोजित मंगळागौर स्पर्धेतुंन महत्वपूर्ण सामाजिक संदेश ...चित्राताई पाटील

## श्रावणमासी हर्षमानसी.. महिलांच्या आनंदासाठी पैठणी व नथणींसह विविध भेट वस्तू बक्षिसे....

**दैनिक युवक आधार**
**खोपोली प्रतिनिधी**

हिंदू संस्काराचा वसा जपत सामाजिक उपक्रम राबविणारी संस्था विक्रम साबळे फाउंडेशनच्या वतीने मंगळागौर पारंपारिक लोकनृत्य स्पर्धेचे आयोजन मोठया धुमधडाक्यात पार पडले असून या कार्यक्रमात विविध स्पर्धनमधून विजेत्या महिलांनी असंख्य पैठणी आणि सोन्याच्या नाथणींचे बक्षिसे मिळाले.

खोपोली नगरीत सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर असणारे भाजप युवा नेते विक्रम साबळे व माजी नगरसेवक अविनाश तावडे यांच्या संकल्पनेतून विक्रम साबळे फाउंडेशन तर्फे नेहमीच्या पारंपरिक खेळांना फाटा देत अतिशय नावीन्यपूर्ण पध्दतीने विविध कलेतून सामाजिक संदेश देत मंगळागौरी कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले .




भाजप सरकारच्या लोक उपयोगी कल्याणकारी योजना राबवताना विक्रम साबळे फाउंडेशनच्या माध्यमातून जनतेसाठी शासकीय दाखल्यांचे वाटप, आधार कार्ड नोंदणी शिबीर, नवं मतदार नोंदणी शिबीर, पॅनकार्ड शिबीर, आबा कार्ड शिबीर, विद्यार्थी मार्गदर्शक शिबीर, रोजगार, रक्तदान शिबीर असे विविध शिबीर घेतले जातात . तसेच संस्कृतीक कार्यक्रमात दहीहंडी उत्सव, मंगळागौर स्पर्धा, गणेश आरास स्पर्धा, शालेय स्पर्धा, मैदानी खेळांच्या स्पर्धा द्वारे खोपोलिकारांना या निमित्ताने एक महत्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध होत आहे .या सर्व कारणांमुळे खोपोली शहरात सध्या चर्चा ऐकायला मिळत आहे ती म्हणजे साबळे यांच्या निमित्ताने मिळालेलं एक नवं नेतृत्व आणि राजकीय विकल्प .

श्रावणमासी हर्षमानसी निमित्ताने महिलांना आपल्या कला गुणांना वाव मिळावा या उद्देश्याने मंगळागौर कार्यक्रमात आपली संस्कृती जोपासत हा उत्साही वसा पुढच्या पिढीकडे सोपवण्यासाठी अनेक कार्यक्रम ठेवण्यात आले होते. त्यात वयोवृद्ध महिलांचा उत्साही सहभाग वाखाणण्याजोगा होता. यावेळी प्रत्येक महिला हा आनंद लुटण्यासाठी खोपोली सह खालापूर तालुक्यातुंन उपस्थित होत्या. असंख्य महिला मंडळानी या स्पर्धेत सहभाग घेत संगीत,नृत्य, योग, खेळ, उखाणे घेत अनेक बक्षीसे जिंकली. मंगळा गौर स्पर्धा आणि वेष भुषा स्पर्धेत महिलांनी एका पेक्षा एक कला सादर करत अभिनेत्री रसिका वेंगुर्लेकरांशी मज्जा मस्तीत मनमुराद गप्पा केल्या . या स्पर्धेत विक्रम साबळे फाउंडेशन तर्फे प्रोत्साहन भेट तर विजेत्यांना इंद्रायणी साडी सेंटर व द्वाराकादास शामकुमार साडी सेंटर यांकडून पैठणी व आर टी झवेरी यांकडून सोन्याच्या नथाणींचे वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमासाठी डोंबिवलीच्या प्रसिद्ध योगसखी महिला मंडळाच्या सदस्या उपस्थित होत्या. तसेच प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्राची हास्य जत्रा फेम रसिका वेंगुर्लेकर तर प्रमुख पाहुण्या म्हणून भारतीय जनता पार्टी च्या महिला मोर्चा दक्षिण जिल्हा अध्यक्षा चित्रा पाटिल, उत्तर रायगड जिल्हाध्यक्षा अश्विनी पाटील उपस्थित होत्या. प्रसिद्ध उद्योजक यशवंतशेठ साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सांगता विक्रम साबळे फाउंडेशन यांच्या वतीने विक्रम साबळे व अविनाश तावडे यांनी सर्वांचे आभार मानले

# पोलीस स्टेशन अड्याळ येथे गणेश उत्सव संबंधाने बैठक संपन्न उपविभागीय पोलीस अधिकारी मनोज सिडाम यांनी केले मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे भंडारा**




--पवनी तालुक्यातील अड्याळ येथे उपविभागीय पोलीस अधिकारी मनोज सिडाम पवनी यांच्या प्रमुख उपस्तितीत आगामी श्रीगणेश उत्सव 2025 संबंधाने आज दिनांक 21/8/2025 रोजी 10/30 वा. ते 12/25 वा. पावेतो पोलीस स्टेशन परिसरातील सर्व गणेश मंडळ पदाधिकारी, पोळा, मारबत, ईद - ए - मिलद शांतता कमेटी सदस्य तसेच पो. स्टे. परिसरातील सर्व डि.जे अँड साउंड सिस्टीम पदाधिकारी यांची बैठक आयोजीत करण्यात आली. सदर बैठकीत उपस्थित डि.जे अँड साउंड सिस्टीम पदाधिकारी यांना शासनांकडून प्राप्त ध्वनी प्रदुषण नियमांचे तंतोतंत पालन करावे, वेळेबाह्य व नियमबाह्य वाजवू नये, ध्वनीमर्यादेपेक्षा अधिक वाजवू नये, वादग्रस्त गाणे वाजवू नये, वाजविणा-या गाण्यांची आगाउ यादी प्राप्त करून घेणे, वाहनावर डिजे बसवतांना आरटीओ कडून रितसर परवानगी घेणे यासंबंधाने योग्य त्या मार्गदर्शक सुचना दिल्या. सदर बैठकीसाठी गणेश मंडळ, शांतता कमेटी सदस्य, मारबत पोळा, असे 100 ते 120 पदाधिकारी उपस्थित होते, ही बैठक अड्याळ येथील ठाणेदार धनंजय पाटील यांनी आयोजित केली होती.

# विंचूर उपबाजार आवारात विशमुक्त शेतीवर मार्गदर्शन

## सेंद्रिय शेती काळाची गरज : मोरे

**दैनिक युवक आधार**
**जनार्दन चव्हाण**
**विंचूर प्रतिनिधी**
**विंचूर....**

रासायनिक खते व कीटकनाशके यांचा अतिरेकी वापर मानवाच्या आरोग्यासह माती, पाणी व पर्यावरणावर गंभीर परिणाम करत आहे. त्यामुळे शाश्वत शेती व निरोगी समाजासाठी सेंद्रिय शेतीच काळाची खरी गरज आहे, असे प्रतिपादन दिंडोरीप्रणीत श्री स्वामी समर्थ केंद्राचे मार्गदर्शक आबासाहेब मोरे यांनी केले.

विंचूर उपबाजार आवारात श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या कृषी विभागातर्फे "विषमुक्त शेती व बाजारपेठ" या विषयावर शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पंढरीनाथ थोरे, लासलगाव मर्चंट बँकेचे संचालक कैलास सोनवणे, विलास गोरे, पांडुरंग राऊत, सोमनाथ शिरसाट, संजय घायाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

मोरे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, देशी गायीचे शेण, गोमूत्र, दूध हे सर्व घटक शेती व मानवाच्या आरोग्यासाठी उपयुक्त असून शेतकऱ्यांनी देशी गायींचे संगोपन करणे अत्यावश्यक आहे. शेतीची उत्पादकता व मातीचे आरोग्य टिकवण्यासाठी शेतकऱ्यांनी बांध मजबूत ठेवावेत, बांधावर झाडे लावावीत व सेंद्रिय पद्धतीला प्राधान्य द्यावे, असे त्यांनी आवाहन केले.

सध्या गावरान व सेंद्रिय कृषी उत्पादनांना बाजारात चांगली मागणी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी गावरान बियाण्यांचा वापर करून सेंद्रिय शेतीकडे वळले पाहिजे, असेही मोरे यांनी स्पष्ट केले. केंद्रामार्फत शेतकऱ्यांना गावरान बियाणे उपलब्ध करून दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनायक महाले यांनी केले, तर विलास गोरे यांनी आभार मानले. या प्रसंगी शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# शिक्षणप्रेमी विद्येचाउपासक आदरणीय अशोक ठाकूर सर यांना देवाज्ञा

**दैनिक युवक आधार**
**उरण प्रतिनिधी /हेमाली पाटील**



समर्थ वचन आहे 'मरावे परी कीर्तीरुपी उरावे ',जीवन हे क्षणभंगुर आहे. जीवनात येताना पाठीमागे काही तरी आठवण ठेवून जावे व ती आठवण समाजोपयोगी ठरेल,अस काही तरी असावे. आत्माराम ठाकूर मिशन संचलित व जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कुल आवरे चे संस्थापक व अध्यक्ष, एक शिक्षण प्रेमी, विद्येचे उपासक अशोक ठाकूर सर यांचे देशाच्या स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी म्हणजे 15 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10 वाजता दुःखद निधन झाले. सर यांनी स्वतः 15 ऑगस्ट रोजी आपल्या शाळेतील स्वतंत्रता रॅली ही स्वतःपाहिली व नंतर देह त्यागिला. स्वामी विवेकानंद यांचे विचार व व्यक्तिमत्त्व यांचा सरळत्यांच्या वर प्रभाव होता. आपल्या जीवनात आदर्श मानत शिक्षकी पेशा हा व्यवसाय स्वीकारून विद्यार्थी हित आयुष्यभर जपत शिक्षणाची कास उराशी धरुन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण कसे देता येईल, आपला विद्यार्थी जागतिक पातळीवर कसा यशाचे शिखर गाठेल, इंग्रजी या भाषेवर प्रभुत्व कसे मिळविता येईल कारण जगाची भाषा ही इंग्रजी आहे ते ज्ञान अवगत करण्यासाठी आपल्या मायभूमीत आपल्या आईच्या स्मृतिप्रीत्यर्थ जानकीबाई जनार्दन ठाकूर इंग्लिश मेडीयम स्कुल आवरेची स्थापना केली. विज्ञान या शाखेचे पदवीधर असल्याने विज्ञान व गणित या विषयावर विशेष प्रभुत्व होते. अतिशय उत्तम पध्दतीने शिकवत असत.आपल्या शिक्षकी पेशाची सुरवात कर्मवीर आण्णा च्या रयत शिक्षण संस्थेत खालापूर येथील न्यु इंग्लिश स्कुल वावलें येथून केली.तसेच कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन न्यु इंग्लिश स्कुल रिटघर, न्यु इंग्लिश स्कुल डोलखांब, खोपटे भाग शाळा या सर्व शाळांवर अध्यापनचे काम केले. तसेच सुरुवातीला पदवीधर असताना आपल्या गावी रामचंद्र म्हात्रे विद्यालय आवरे विद्यालयात ज्ञानार्जन केले. सर यांनी आपल्या कारकी दर्जेविद्यार्थी घडविले. ठाकूर सर अंत्यसंस्कार समयी सर्वच क्षेत्रातील लोक व विद्यार्थ्या वर्ग हा ठाकूर सर यांना आदरांजली देण्यासाठी उपस्थित होता. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवरानी ठाकूर सर यांची साधी राहणी व उच्च विचार सरणी तसेच सर यांचा जीवनप्रवास, तसे च ठाकू र सर यांचं कार्य अनमोल आहे व प्रेरणा घ्यावी अशी आपली प्रतिक्रिया शोक संदेशात व्यक्त केली. जो पर्यंत सूर्य चंद्र व हे विश्व आहे तो पर्यंत ठाकूर सर यांचं नाव हे शिक्षण क्षेत्रात अजरामर राहील यात श्री प्रकाश पाटील सर , सुधाकर पाटील साहेब,एम . के म्हात्रे व महेश गावंड आदी मान्यवरांनी व्यक्त केली. सदर प्रसंगी सर यावर प्रेम करणारे असंख्य असा जनसमुदाय आवरे स्मशानभूमीत उपस्थित होता. मृत्य प्रसंगी ठाकूर सर यांचे वय 57वर्ष होते ठाकूर सर यांच्या जाण्याने त्यांच्या कुटूंबियांवर शोक कळा पसरली आहे, हे दुःख सहन करण्याची ईश्वर त्यांना शक्ती देवो. ठाकूर सर यांचं दशविधी दिनांक 24 ऑगस्ट रोजी वशेणी खाडी व उत्तर कार्य हे राहत्या घरी होईल. असा एक शिक्षणप्रेमी काळाच्या पडद्याआड हरवला, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हिच ईश्वर चरणी प्रार्थना..

# स्वाभिमानी मराठा महासंघाच्या महाराष्ट्र राज्य "प्रदेश संपर्क प्रमुख" पदी लक्ष्मीकांत राजे शिर्के

**दैनिक युवक आधार**
**अहिल्यानगर (प्रतिनिधि)**

: भारतासह जागतिक स्तरावर मराठा हिताच्या दृष्टिने शिव-शंभुकार्य करणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघ इतिहास मंचाच्या महाराष्ट्र राज्य "प्रदेश संपर्क प्रमुख" पदी पेडगाव, किल्ले धर्मवीरगड येथील शंभुपत्नी महाराणी येसुबाईंचे तथा स्वराज्यनिष्ठ श्रीमंत गणोजीराजे पिलाजीराव राजे शिर्के यांचे वंशज व इतिहास अभ्यासक श्रीमंत लक्ष्मीकांत गणपतराव राजे शिर्के यांची नुकतीच निवड करण्यात आली असून तसे नियुक्तीपत्र संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी राजे शिर्के यांना दिले आहे.



गडदुर्ग संवर्धक लक्ष्मीकांत राजे शिर्के हे गेल्या ३० वर्षापासून गडदुर्ग संवर्धन कार्यासह दुर्लक्षित वास्तव इतिहास प्रकाशात आणणे, चुकीच्या इतिहासाचे पुरावे देऊन आक्षेप खंडन करणे, मराठ्यांच्या तेजस्वी इतिहासाचा प्रचार प्रसार करणे, पेडगाव गडकिल्ल्याचे नामांकरण चळवळ राबविणे, विविध सामाजिक, शैक्षणिक, प्रबोधनात्मक कार्यक्रम घेणे, युगपुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी, स्मृति दिन, स्मरण दिन आयोजित करणे तसेच शंभुसेना संघटनेच्या माध्यमातून अनेक सामाजिक कार्य राजेशिर्के यांनी केली आहेत. अशा आदी विविध कार्याची दखल घेऊन संघटनेने त्यांची एकमताने सार्थ निवड केली आहे. तसेच वंशज लक्ष्मीकांत राजे शिर्के यांनी नुकतेच इतिहासातील दुर्लक्षित व्यक्तिमत्व शिवस्नुषा, शंभुपत्नी महाराणी येसुबाईंची (राजमाता राजाऊ साहेबांची) जयंती व पुण्यतिथीच्या तारखांचा शोध घेऊन २७ जुलै रोजी राज्यभरात प्रथम जयंती उत्सव सुरू करून तसेच २१ डिसेंबर रोजी पुण्यतिथी होणार असल्याने हे ऐतिहासिक मोलाचे कार्य केल्याने राजेशिर्के यांची आ.स्वा. मराठा महासंघाच्या इतिहास आघाडीच्या महाराष्ट्र राज्य "प्रदेश संपर्क प्रमुख " पदी निवड केली असल्याचे आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघाचे संस्थापक डॉ. कृषीराज टकले, तसेच राष्ट्रीय अध्यक्ष व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

नियुक्ती नंतर बोलताना राजेशिर्के म्हणाले की, आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघ हा ऐतिहासिक वारसा जोपासणारी संघटना असून, राजमाता जिजाऊ साहेब, छत्रपती शिवराय, छत्रपती शंभुराजे व महाराणी येसुबाई (राजमाता राजाऊ) यांच्या तेजस्वी इतिहासाची तरुणांना जाणीव करुन देण्यासाठी संघटना कायम प्रयत्न करत असून, मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी ही संघटना कायम आवाज उठवत आहे. याकार्याला आणखी बळ देता यावं म्हणून आ.स्वा.मराठा महासंघ व इतिहास आघाडीच्या माध्यमातून मराठा समाजाचे संघटन वाढविण्यासाठी, मराठ्यांच्या इतिहासाचा जगभर जागर करण्याकामी, छत्रपती शिवरायांचे नितिशास्त्राचे युवकांना प्रबोधन करण्यासाठी, ऐतिहासिक वास्तुंची माहिती देणे, गडकिल्ले संवर्धन आदी सर्व बाबींवर तरुणांमध्ये जनजागृती करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे राजेशिर्के यांनी सांगितले. लक्ष्मीकांत राजे शिर्के हे सध्या अनेक सामाजिक संस्थावर महत्वाच्या पदावर कार्यरत आहेत.

नियुक्ती झाल्याबद्दल संघटनेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष एम के बी एन आर सागर, आंतरराष्ट्रीय कार्याध्यक्ष रवी प्रताप पटेल, आंतरराष्ट्रीय सचिव चैतन्य रावल, आंतरराष्ट्रीय उपाध्यक्ष हेमंत सरकार, आंतरराष्ट्रीय इतिहास आघाडी आंतरराष्ट्रीय अध्यक्ष व्याख्याते रवींद्र जगदाळे, आंतरराष्ट्रीय कार्याध्यक्ष अमरसिंह जाधवराव, आंतरराष्ट्रीय सचिव उज्वलसिंह गायकवाड, आंतरराष्ट्रीय उपाध्यक्ष इंद्रजीत घोरपडे, राष्ट्रीय कार्याध्यक्ष निलेश धुमाळ पाटील, महिला आघाडी आंतरराष्ट्रीय अध्यक्षा किरण शेखावत, महिला आघाडी भारत राष्ट्रीय अध्यक्षा कोकीळा पवार, राष्ट्रीय उपाध्यक्षा महिला आघाडी शिवशंभू प्रिया जांभळे, इतिहास आघाडी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष महेंद्र निंबाळकर, राष्ट्रीय उपाध्यक्ष दिनेश भैय्या कुर्मी, नाशिक जिल्हा अध्यक्ष प्रताप भोसले, महाराष्ट्र राज्य निरीक्षक व अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष भानुदास वाबळे पाटील आदिंनी स्वागत केले आहे.

# रिसोड मालेगाव क्षेत्रात पालकमंत्री भरणे यांनी नुकसानीची पाहणी

## नकुल देशमुख यांनी केली सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी रणजित सिंह ठाकुर.**

राज्याचे कृषिमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना दत्तात्रयजी भरणे हे वाशिम जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे रिसोड मालेगाव विधानसभा क्षेत्रातील पिकाची नुकसान संदर्भात पाहणी करण्याकरता जिल्हा दौऱ्यावर होते त्यांच्या समवेत भाजप रिसोड मालेगाव विधानसभा निवडणुक प्रमुख नकुल देशमुख यांनी रिसोड मालेगाव विधानसभा क्षेत्रातील नुकसानीची पाहणी केली.महागाव,बायखेड, वाकद, बोरखेडी, शेलू खडसे, शिरपूर, मसला, राजुरा येथे भेट दिली. तसेच शेतकरी बांधवांच्या सोबत संवाद साधला.यावेळी पालकमंत्री दत्तात्रय भरणे बोलताना म्हणाले कि वाशीम जिल्हा आणि रिसोड मालेगाव तालुक्यातील शेतकरी बांधवांच्या शेती पिकाचे पूर्णपणे नुकसान झाले आहे, रिसोड व मालेगाव तालुक्यात तब्बल सहा वेळा अतिवृष्टीने शेतकरी बांधवांना नुकसानीचा फटका सहन करावा लागलेला आहे आणि आता तर शेतकऱ्याच्या पिकाचे संपूर्णपणे नुकसान झालेले आहे त्यामुळे शेतकरी बांधवांना तात्काळ सरसकट मदत देण्यात यावी यासाठी भाजप नेते नकुल देशमुख यांनी पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासोबत प्रवासादरम्यान आणि पाहणी दरम्यान चर्चा केली.महायुती सरकार शेतकऱ्याच्या ठामपणे पाठीशी आहे. नुकसानीचा संपूर्ण मोबदला शेतकरी बांधवांना दिल्या जाणार असल्याबाबत रिसोड मालेगाव विधानसभा क्षेत्रातील शेतकरी बांधवांना कृषिमंत्री तथा पालकमंत्री वाशिम जिल्हा यांनी आश्वस्त केले. यावेळी वाशिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री श्याम खोडे, भाजप जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, भाजपा जिल्हा महामंत्री गजाननराव लाटे, रिसोड ग्रामीण मंडळाचे अध्यक्ष सुभाष खरात, भाजप गोवर्धन मंडळाध्यक्ष अमोल पाटील भुतेकर, पंचायत समिती सदस्य भूषण पाटील दांदडे,अँड गजाननराव देशमुख, प्रकाश आटोळे, संदीप गुंजकर, गणेश भांदुर्गे, सुभाषराव सरोदे सहित रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघात नुकसानग्रस्त भागाची पाहणी दरम्यान ठीक ठिकाणी भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते



# 'केक वर्ल्ड'चे संस्थापक रोहन दिलीप म्हात्रे यांचे निधन; तरुण उद्योजकाची स्वप्ने अधुरी

## कॅन्सरशी झुंज अखेर अयशस्वी ठरली, रोहनची Exit चटका लावणारी

**दैनिक युवक आधार**
**उरण वार्ताहर**

उरणचा धाडसी उद्योजक रोहन दिलीप म्हात्रे यांना कॅन्सरने हिरावून नेले. उरणमधील प्रभावशाली घराण्यात जन्मलेले रोहन म्हात्रे हे केवळ उद्योजक नव्हते, तर ते स्वप्नाळू आणि धाडसी व्यक्तिमत्त्व म्हणून सर्वत्र ओळखले जात. लहानपणापासूनच हटके विचार आणि वेगळी शैली हे त्यांचे वैशिष्ट्य होते. कधी कॉलेजचे लेक्चर टाळण्यासाठी खोटं नाटक करणं तर कधी सलमान खानचा चित्रपट लागला की संपूर्ण थिएटर मित्रांसाठी बुक करणे, अशा खोडकर पण लाघवी आठवणी त्यांचे मित्र आजही सांगतात. या साऱ्या रंगतदार आयुष्याच्या मागे समाजासाठी आणि मित्रपरिवारासाठी काहीतरी वेगळं करण्याची त्यांची ओढ होती. माझे मित्रही श्रीमंत झाले तर खरी मजा येते, हे त्यांचे वाक्य आजही स्मरणात आहे. रोहन म्हात्रे यांची व्यावसायिक आयुष्याची सुरुवात रिअल




इस्टेटपासून झाली. द्रोणागिरी प्रकल्पात त्यांनी मॉड्युलर किचन, वाय-फाय अशा त्या काळी अत्यंत दुर्मिळ आधुनिक सोयी दिल्या. प्रकल्प लॉंच होताच विकला गेला, मात्र शासकीय अडचणींमुळे त्याला हाव्यवसाय पटला नाही. त्यानंतर त्यांनी जीवन बदलणारा उपक्रम हाती घेतला तो म्हणजे 'दी केक वर्ल्ड'. 24 डिसेंबर2015 रोजी कामोठे येथे पहिलं केक वर्ल्ड हे शॉप सुरु झालं. खेळण्यांच्या दुकानासारखा दिसणारा स्टोर म्हणजे 'केकवर्ल्ड', प्रत्येक केकसोबत छोटी गिफ्ट अशी नवी संकल्पना ग्राहकांना भुरळ घालणारी ठरली. पहिल्या दिवसापासूनच मोठी गर्दी झाली आणि केक वर्ल्डची गरुड झेप सुरु झाली. एका वर्षात 9 शाखा सुरू झाल्या तर 2020 पर्यंत 70 दुकाने व 400 कर्मचारी या परिवारात सामील झाले. रोहन यांनी केक वर्ल्डला केवळ दुकान न ठेवता स्टार्टअपसारखे चालवले. रिअल-टाईम सेल्स डेटा, ग्राहकांच्या पसंतीचे विश्लेषण, कर्मचाऱ्यांसाठी परदेशी टूर यांसारख्या योजना त्यांनी राबवल्या. अगदी मर्सिडीज कारमधून केक डिलिव्हरी करण्याचाही त्यांनी विचार केला होता. कोविड-19 महामारीच्या कठीण काळात जेव्हा अनेकांनी खर्च कपात आणि कर्मचारी कपातीचा मार्ग निवडला, तेव्हा रोहन यांनी एकाही कर्मचाऱ्याला कमी केले नाही. पगार ही वेळेवर दिले, दुकानांचे भाडेही वेळेवर भरले आणि सर्व जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडल्या. "आपण अजून तरुण आहोत, विश्वास निर्माण करायचा आहे, ब्रँड उभा करायचा आहे," अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती. कोविड-19 च्याकाळात त्याने नव्या नव्या संकल्पना केल्या, मिठाई चेन, बिर्याणी ब्रँड, शाकाहारी रेस्टॉरंट्स, चिप्स-वेफर्स अशा अनेक उपक्रमांच्या योजना त्यांनी आखल्या होत्या. परंतु 2022 मध्ये कॅन्सरचे निदान झाल्यानंतर जीवनाने कठोर वळण घेतले. 20 हून अधिक प्रक्रिया, दोन मोठ्या शस्त्रक्रिया आणि वेदनादायी उपचार सहन करूनही त्यांचा आत्मविश्वास कायम होता. हॉस्पिटलमध्ये असतानाच त्यांनी आत्मचरित्रात्मक पुस्तक लिहायला सुरुवात केली होती. त्यांच्या निधनानंतर आजही 'केक वर्ल्ड'च्या माध्यमातून त्यांची स्वप्नं जिवंत आहेत. कर्मचाऱ्यांबद्दलची जबाबदारी, समाजासाठी विचार आणि उद्योजकतेतील धाडसी दृष्टिकोन हीच त्यांची खरी ओळख ठरली. रोहन दिलीप म्हात्रे गेले असले तरी त्यांची स्वप्नं आजही पूर्ण होत आहेत एक केक, एक स्माईल आणि एक नवा उद्योजक निर्माण करत ते अखंड आमच्या सोबतच आहेत असे त्यांचे कुटुंबीय सहकारी आणि कर्मचारी सांगत आहेत.

## सण उत्सवांच्या तोंडावरच पोलिस निरीक्षक विठ्ठल दराडे यांची बदली!!

### तालुक्यातील नागरिकात नाराजी..

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर शिरूर अनंतपाळ :**
तालुक्यात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दल सतत कार्यरत आहे. मात्र, कधीकधी प्रशासनाचेच काही निर्णय या शांततेला सुरुंग लावतात का ?असा प्रश्न निर्माण होतो. अशीच एक घटना शिरूर अनंतपाळ पोलिस ठाण्यात घडली आहे.तालुक्यात अवैध धंदे, चोऱ्या, खून, अशा अनेक गुन्ह्याची नोंद असलेल्या आणि शासनदरबारी 'अतिसंवेदनशील' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठाण्याचे ठाणेदार विठ्ठल दराडे यांची आगामी सण उत्सवांच्या तोंडावरच अचानक बदली करण्यात आल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे. प्रशासनाचा निर्णय म्हणजे स्वतःच्या पायावर 'कायदा व सुव्यवस्थेची कुऱ्हाड' मारून घेतल्यासारखा आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.
तालुक्यात राजकीय, सामाजिक, शैक्षणिक,आणि धार्मिक परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची आहे. इथे अनेक वर्षांपासून जातीय तणावाचे वातावरण राहिले आहे. अशा ठिकाणी काम करणे म्हणजे केवळ कर्तव्य बजावणे नाही, तर एकप्रकारचे आव्हानच आहे. त्यातच सण, उत्सवाचे दिवस म्हंटले की, येथे नेमणूकीस असलेल्या अधिकाऱ्यांच्या डोळ्याला झोप आणि पोटाला भाकर नसते. तर प्रशासनाच्या नजराही
लागुन असतात. गेल्या दोन वर्षापूर्वी या ठिकाणी पोलिस निरीक्षक म्हणून नेमणूक मिळालेल्या विठ्ठल दराडे यांनी अत्यंत कौशल्याने हे आव्हान पेलले आहे. गुन्हेगारांसाठी कर्दनकाळ म्हणून ओळख निर्माण करत असतांनाच, सर्वसामान्य जनतेमध्ये पोलीस दलाविषयी विश्वास वाढवला. पोलीस आणि जनता यांच्यात सुसंवाद साधला. त्यांच्या कार्यकाळात शांततेची घडी अत्यंत चांगल्या पध्दतीने बसली आणि आजपर्यंत एकही अप्रिय घटना घडली नाही, ही त्यांच्या कामाची पावती आहे. माणसातला देव माणूस म्हणून ओळख असलेले आमचे लाडके पोलिस निरीक्षक श्री विठ्ठल दराडे यांची लातूर जिल्ह्याच्या ठिकाणी बदली झाली आहे.आता गणेशोत्सव अगदी तोंडावर आहे. संवेदनशील तालुक्यात हा उत्सव शांततेत पार पाडणे हे प्रशासनासाठी मोठे आव्हान आहे. अशा परिस्थितीत, ज्या अधिकाऱ्याला या परिसराचा आणि इथल्या लोकांचा सखोल अभ्यास आहे, तोच अधिकारी या ठिकाणी असणे आवश्यक असते. कोणताही
नवीन अधिकारी आल्यास त्याला सदर ठिकाणची परिस्थिती समजून घ्यायला वेळ लागतो. अशावेळी कायदा व सुव्यवस्था राखणे हे त्यांच्यासाठी एक मोठे आव्हान ठरू शकते, हे ज्ञात असतांनाही इथे परिस्थती नेमकी उलटी घडली आहे. ऐन सण उत्सवांच्या तोंडावरच ठाणेदारांची बदली करण्यात आली असून, प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

**प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण ?**
सर्वदूर बेकायदा व्यवसाय सुरु असतांना, ज्या अधिकाऱ्याने 'वाम' मार्गाच्या कमाईला थारा दिला नाही, ज्या अधिकाऱ्याविरुद्ध राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रातून दोन वर्षभरात एकही तक्रार नाही. खाकी वर्दीला आपले जीवन मानत जनतेचा विश्वास जिंकला, 'कुठे आदरयुक्त, तर दरारयुक्त' भिती निर्माण करत यशस्वीपणे तालुक्यात शांतता प्रस्थापित केली, अशा अधिकाऱ्याची बदली आणि तेही सण उत्सवाच्या तोंडावर करणे योग्य आहे का? या निर्णयामागील नेमका तर्क काय आहे? ही केवळ एका अधिकाऱ्याची बदली नाही, तर शांततेला धक्का देणारी घटना आहे. यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे.

## लायन्स क्लब ऑफ मुरुड जंजिरा तर्फे क्षयरोग रुग्णांना पौष्टिक आहार वाटप

### लायन्स प्रेसिडेंट लायन सनी सोगावकर यांचा पुढाकार




**दैनिक युवक आधार**
**पंडीत फंगाळ (पनवेल) :**
शासनाच्या आरोग्य विभाग राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत लायन्स क्लब ऑफ मुरुड जंजिरा तर्फे प्रेसिडेंट लायन सनी सोगावकर यांच्या पुढाकारातून तहसीलदार आदेश डफळ यांच्या मार्गदर्शनाखाली दहा क्षयरोग रुग्णांना पौष्टिक आहाराचे वाटप करण्यात आले.
लायन्स क्लब ऑफ मुरुड जंजिराचे प्रेसिडेंट लायन सॅमसन उर्फ सनी सोगावकर यांची राष्ट्रीय क्षय रोग दुरीकरण कार्यक्रमाअंतर्गत तालुकास्तरीय टीबी फोरम समितीवर सदस्यपदी नेमणूक करण्यात आली असून लायन्स क्लब आणि सहाका-यांच्या माध्यमातून व स्वतः च्या पुढाकारातून तालुक्यातील दहा टीबी ग्रस्त रुग्णांना सहा महिन्याचे पौष्टिक अन्न देण्यार येणार आहे.
याचाच भाग दि.१८ऑगस्ट२०२५ रोजी तहसील कार्यालयात एक महिन्याचे पौष्टिक अन्न दहा क्षयरोग रुग्णांना देण्यात आले. यावेळी तहसीलदार आदेश डफळ, तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.पायल राठोड तसेच लायन्स क्लब ऑफ मुरुड जंजिराचे प्रेसिडेंट ला.सनी सोगावकर,लायन सदस्य नयन कर्णिक,नैनिता कर्णिक,संजय गुंजाळ, सायली गुंजाळ. बोर्लीचे माजी सरपंच नौशाद दळवी,राजा सोडेकर तसेच इतर टीबी फोरम समिती सदस्य उपस्थित होते.

## पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या मार्फत दंगा काबू योजनेची रंगीत तालीम

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**
आगामी गणेश उत्सव व ईद-ए-मिलाद सण-उत्सवाचे अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत आज पाडा मोहल्ला मस्जिद मुसलमान नाका पनवेल या ठिकाणी दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली.



सदर दंगा काबू योजनेत पनवेल शहर पोलीस ठाणे कडील वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली 2 पोनि, 7 सपोनि, पोउपनि, 42 अंमलदार, बीट मार्शल 1,2,3 वरील अंमलदार, मोबाईल 1 वरील अंमलदार, डीपी पथकाकडील 6 अंमलदार, झोन 3 स्ट्राइकिंगसह 1 अधिकारी 09 अंमलदार, फायर बिग्रेड गाडीसह 01 अधिकारी 05 अंमलदार, पनवेल मनपा कडील 2 रुग्णवाहिका स्टाफ सह हजर होते. नमूद दंगा काबू योजना संपल्यानंतर पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील भारत नगर, कोळीवाडा परिसरात कोंबिंग ऑपरेशन सुरू करण्यात आले. तसेच टपाल नाका, आदिल टॉवर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, उरण नाका या ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली होती.
फोटो : दंगा काबू योजना

## आमठाणा-घाटनांद्रा येथे युरिया खताची जादा दराने विक्री, कृषी अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

### विक्रेत्यांवर कारवाई न केल्यास कृषी विभागाला ताळे ठोकू-राहुल पाटील सपकाळ

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
सिल्लोड

:- तालुक्यातील आमठाणा व घाटनांद्रा येथे काही खत विक्री दुकानांमध्ये युरिया खताची 266 रुपयाची गोणी 450 ते 500 रुपये दराने विक्री करण्यात येत असून त्यासोबत नको असलेली खते जबरदस्तीने युरिया खतासोबत देण्यात येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची पिळवणूक करण्यात येत आहे. या गोष्टीकडे कृषी विभागाने मात्र गांधारीची भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. या प्रकारचे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचे सोयीस्कर दुर्लक्ष होत असून शेतकऱ्यांमध्ये




संतापाची तीव्र लाट आहे. संबंधित कृषी अधिकारी यांनी शेतकऱ्यांच्या या अडवणुकीकडे लक्ष देऊन लवकरात लवकर खत विक्रेत्यावर कारवाई करावी व शेतकऱ्यांना युरिया उपलब्ध करून द्यावा अन्यथा सिल्लोड तालुका कृषी कार्यालयाला टाळे ठोकण्यात येईल असा इशारा शिवसेना युवा तालुकाप्रमुख राहुल पाटील सपकाळ यांनी दिला आहे .
यंदा वेळेवर पाऊस झाल्याने तालुक्यात 97 हजार हेक्टर वर खरीप पिकाचा पेरा झाला असून कृषी विभागाकडून काही प्रमाणात युरिया खताचे वाटप करण्यात आले परंतु गरजेनुसार अजून आमठाणा व घाटनांद्रा येथे युरियाची आवश्यकता असून गरजेएवढा युरिया उपलब्ध झाला नसल्याने टंचाई निर्माण झाली आहे. याचा फायदा घेत कृषी दुकानदार चढ्या भावाने विक्री करत असल्याचे आढळून येत आहे.

कृषी विभागाचे सोयीस्कर दुर्लक्ष :
यंदा पाऊस चांगला होत असल्याने पिके ऐन बहरात असून त्यांना गरजेच्या वेळी खताची टंचाई निर्माण झाली आहे. परंतु आमठाणा व घाटनांद्रा येथे काही ठिकाणी खते उपलब्ध असताना पण व्यापारी एकजूट करून शेतकऱ्यांची आडवणूक करत आहे .व राजरोसपणे जादा दराने खत विक्री सुरू असताना देखील कृषी विभाग मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. या प्रकारचे कृषी विभागाचे सोयीस्कर दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांचा वाली कोण? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

## आमठाणा-घाटनांद्रा येथे युरिया खताची जादा दराने विक्री, कृषी अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

### विक्रेत्यांवर कारवाई न केल्यास कृषी विभागाला ताळे ठोकू-राहुल पाटील सपकाळ

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड :-** तालुक्यातील आमठाणा व घाटनांद्रा येथे काही खत विक्री दुकानांमध्ये युरिया खताची 266 रुपयाची गोणी 450 ते 500 रुपये दराने विक्री करण्यात येत असून त्यासोबत नको असलेली खते जबरदस्तीने युरिया खतासोबत देण्यात येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची पिळवणूक करण्यात येत आहे. या गोष्टीकडे कृषी विभागाने मात्र गांधारीची भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. या प्रकारचे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचे सोयीस्कर दुर्लक्ष होत असून शेतकऱ्यांमध्ये संतापाची तीव्र लाट आहे. संबंधित कृषी अधिकारी यांनी शेतकऱ्यांच्या या अडवणुकीकडे लक्ष देऊन लवकरात लवकर खत विक्रेत्यावर कारवाई करावी व शेतकऱ्यांना युरिया उपलब्ध करून द्यावा अन्यथा सिल्लोड तालुका कृषी कार्यालयाला टाळे ठोकण्यात येईल असा इशारा शिवसेना युवा तालुकाप्रमुख राहुल पाटील सपकाळ यांनी दिला आहे .
यंदा वेळेवर पाऊस झाल्याने तालुक्यात 97 हजार हेक्टर वर खरीप पिकाचा पेरा झाला असून कृषी विभागाकडून काही प्रमाणात युरिया खताचे वाटप करण्यात आले परंतु गरजेनुसार अजून आमठाणा व घाटनांद्रा येथे युरियाची आवश्यकता असून गरजेएवढा युरिया उपलब्ध झाला नसल्याने टंचाई निर्माण झाली आहे. याचा फायदा घेत कृषी दुकानदार चढ्या भावाने विक्री करत असल्याचे आढळून येत आहे.
कृषी विभागाचे सोयीस्कर दुर्लक्ष
:
यंदा पाऊस चांगला होत असल्याने पिके ऐन बहरात असून त्यांना गरजेच्या वेळी खताची टंचाई निर्माण झाली आहे. परंतु आमठाणा व घाटनांद्रा येथे काही ठिकाणी खते उपलब्ध असताना पण व्यापारी एकजूट करून शेतकऱ्यांची आडवणूक करत आहे .व राजरोसपणे जादा दराने खत विक्री सुरू असताना देखील कृषी विभाग मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. या प्रकारचे कृषी विभागाचे सोयीस्कर दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांचा वाली कोण? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

## काळजाचा ठोका चुकवणारा अपघात!

### पारवा रोडवर शिक्षकांच्या मिनी व्हॅनचा चक्काचूर; तीन गंभीर

**दैनिक युवक आधार -**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि.**
**महेश पेन्दोर.**
**घाटंजी -** कर्तव्य बजावून घरी परतणाऱ्या शिक्षकांच्या मिनी व्हॅनला भरधाव ट्रकने जोरदार धडक दिली. यात व्हॅनचा चक्काचूर झाला असून, तीन शिक्षक गंभीर जखमी झाले आहेत. ही थरारक घटना बुधवार, २० ऑगस्ट रोजी सायंकाळी पारवा रोडवरील रसिकाश्रय संस्थेजवळ घडली. सायंकाळी ड्युटी संपवून यवतमाळ आणि घाटंजी परिसरातील शाळेतील शिक्षक मिनी व्हॅनमधून घरी परत येत होते. त्याच वेळी समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने (क्रमांक एपी ०१ व्ही ८२८२) त्यांच्या व्हॅनला (क्रमांक एमएच ३० एए ५६०२) जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, व्हॅनचा अक्षरशः चक्काचूर झाला. या अपघातात व्हॅनमधील जवळपास १५-१६ शिक्षकांपैकी तीन शिक्षक गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी



तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. रुग्णवाहिकेच्या मदतीने जखमी शिक्षकांना आधी घाटंजी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले आहे.
या अपघातामुळे परिसरात काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. या घटनेमुळे शिक्षक वर्गात हळहळ व्यक्त होत आहे.

## नुकसानग्रस्तांना शासनाकडून सर्वतोपरी मदत केली जाईल आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन

**दैनिक युवक आधार**
**नांदेड वार्ताहर**
- राज्यात मागील 4 दिवसांपासून सतत पाऊस सुरू आहे. नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील लेंडी धरणाच्या प्रभावक्षेत्रात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्याने रावणगाव, हसनाळ, भिंगोली, भासवाडी या गावामध्ये पाणी शिरले. या गावांमध्ये मोठ्याप्रमाणात जनावरांचे नुकसान होऊन 5 नागरिकांचा मृत्यू झाला आहे. अनेक हेक्टर क्षेत्रावरील शेतीचे नुकसानही झाले आहे. या नुकसानीचा अंदाज घेऊन नुकसानग्रस्त गावातील नागरिकांना शासनाच्यावतीने सर्वतोपरी मदत करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे जलसंपदा विदर्भ, ताणी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.
यावेळी मृत्तांच्या वारसदारांना प्रत्येकी 4 लाख रुपयांची मदत धनादेश स्वरुपात मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते वितरीत करण्यात आली.
आज नांदेड जिल्ह्यात नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी मंत्री गिरीश महाजन हे दौऱ्यावर आले. त्यांनी मुखेड तालुक्यातील हसनाळ या गावातील पूरग्रस्त भागाची पाहणी करुन येथील नागरिकांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणुन घेतल्या. तसेच मारजवाडी या पुर्नवसीत गावालाही त्यांनी भेट देऊन तेथील गावकऱ्यांशी संवाद



उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, परिसरातील शेतकरी, नागरिक आदींची उपस्थिती होती. यावेळी आमदार डॉ. तुषार राठोड यांनी या भागात पूरपरिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती मंत्री गिरीश महाजन यांना दिली.
यावेळी मंत्री गिरीश महाजन यांनी तात्काळ पंचनामे करण्याचे जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले. त्यांनी स्थानिक नागरिकांच्या समस्याही जाणून घेतल्या. त्यांच्या या समस्यांबाबत लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन त्या सोडविण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. तसेच या भागातील नुकसानग्रस्तांचा रोष जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांवर असल्याचे कळल्यानंतर याबाबत लवकरच चौकशी करुन दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात येईल, असे मंत्री गिरीश महाजन यांनी स्पष्ट केले.

**मृतांच्या वारसदारांना मदत**
नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्यू झालेल्या नागरिकांच्या वारसदारांना यावेळी प्रत्येकी 4 लाख रुपयाची मदत धनादेश स्वरुपात आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते देण्यात आला. मृत्यू झालेल्या व्यक्ती व त्यांचे वारसदार याप्रमाणे आहेत. मृत्य व्यक्ती पिराजी म्हैसाजी थोटवे वय 70 त्यांचे वारस मारोती पिराजी थोटवे मुलगा. चंद्रकला विठ्ठल शिंदे वय 35 त्यांचे वारस विठ्ठल व्यंकटराव शिंदे पती. ललिताबाई गोविंद भोसले वय 60 त्यांचे वारस मुलगा जगदीश गोविंद भोसले व मधुकर गोविंद भोसले. भीमाबाई हिरामण मादाळे वय 65 त्यांचे वारस संग्राम हिरामण मादाळे, राहुल हिरामण मादाळे मुले. गंगाबाई गंगाराम मादाळे वय 65 त्यांचे वारस मुलगी लालाबाई व्यंकट मादाळे यांना मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात.

## महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री आणि पनवेल महापालिकेच्यावतीने वृक्षारोपण अभियान संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**
: महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री आणि पनवेल महापालिकेच्यावतीने वृक्षारोपण अभियान राबवले जात आहे. त्यापार्श्वभुमीवर विचुंबे रोडवर वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले




असून त्यांनी यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री आणि पनवेल महापालिकेच्यावतीने निसर्ग समृध्द करणारे अभियान राबवल जात असल्याबद्दल त्यांचे आभार मानून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.
यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्रीचे रायगड अध्यक्ष तथा माजी नगरसेवक अरविंद सावळेकर, संस्थापक अध्यक्ष राजेश प्रजापती, माजी अध्यक्ष महेश नागराजन, प्रोजेक्ट चेअरमन जयेश गांधी, उपाध्यक्ष हितेश गढिया, वैभव अग्रवाल खजिनदार प्रिया गुरुनानी, जॉइंट सेक्रेटरी प्रशांत शेवडे, पीआरओ लक्ष्मण साळुंखे, यूथ अध्यक्ष जितेश अग्रवाल, कार्यकारिणी सदस्य अनिरूद्ध सावळेकर, प्रतिक पोटे यांच्यासह पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक ऍडव्होकेट मनोज भुजबळ, तेजस कांडपीळे, प्रभाकर बहिरा, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, किशोर सुरते, पनवेल महापलिकेचे उपायुक्त वैभव विधाते आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री रायगड असोसिएशनचे सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रसिध्द निवेदक महेश गाडगीळ यांनी केले.